सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १३ एप्रिल २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा कायापालट : रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आभार व्यक्त

मुंबई, दि. ११ :- भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील रेल्वेच्या दर्जेदार पायाभूत सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री.वैष्णव यांचे आभार मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे, जसे की – अकलकोट रोड, दौंड, इगतपुरी, चांदा फोर्ट, मालाड, डोंबिवली, चिंचवड इत्यादींचा समोवश आहे.

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. अजनी स्टेशन (२९७.८ कोटी), नागपूर जं. (५८९ कोटी), नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जं. (१७.४ कोटी), जालना (१८९ कोटी), छत्रपती संभाजीनगर (२४१ कोटी), रोटेगाव (१२ कोटी), अहिल्यानगर (३१ कोटी), भायखळा (३५.५ कोटी), चिंचपोकळी (५२ कोटी), चर्नी रोड (२३ कोटी), छत्रपती शिवाजी महाराज टमिनल (१८१३ कोटी), ग्रॅंट रोड (२७ कोटी), लोअर परेल (३० कोटी), मरिन लाईन्स (२७.७ कोटी), सॅण्डहर्स्ट रोड (१६.४ कोटी), मुर्तिजापूर स्टेशन (१३ कोटी), बडनेरा (३६.३ कोटी), बारामती (११.४ कोटी), दौंड (४४ कोटी), केडगाव (१२.५ कोटी), परळी वैजनाथ (२५.७ कोटी), भंडारा रोड (७.७ कोटी), गोंदिया ४० कोटी), तुमसर रोड (११ कोटी), टिटवाळा (२५ कोटी), शेगाव (२९ कोटी), बल्लारशाह (३१.४ कोटी), चंद्रपूर (२५.५ कोटी), चांदा फोर्ट (१९.३ कोटी), धुळे (९.५ कोटी), लासलगाव (१०.५ कोटी), मनमाड (४५ कोटी), नगरसोल (२०.३ कोटी), नांदगाव (२० कोटी), आमगाव (७.८ कोटी), वडसा (२०.५ कोटी), हातकंणगले (६ कोटी), हिमायतनगर (४३ कोटी), हिंगोली डेक्कन (२१.५ कोटी), किनवट (२३ कोटी), चाळीसगाव (३५ कोटी), अंमळनेर (२९ कोटी), धरणगाव (२६ कोटी), पाचोरा जं. (२८ कोटी), दिवा (४५ कोटी), मुंब्रा (१५ कोटी), शहाड (८.४ कोटी), कोल्हापूर – छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (४३ कोटी), लातूर (१९ कोटी), जेऊर (२० कोटी), कुर्डूवाडी जं (२० कोटी), फलटण (१ कोटी), वाठर (८ कोटी), आकुर्डी (३४ कोटी), चिंचवड (२०.४ कोटी), देहू रोड स्टेशन (८.०५ कोटी), तळेगाव स्टेशन (४०.३४ कोटी), मालाड स्टेशन (१२.३२ कोटी), कुर्ला जं. स्टेशन (२८.८१ कोटी), कांजुरमार्ग स्टेशन (२७ कोटी), विद्याविहार स्टेशन (३२.८ कोटी), विक्रोळी स्टेशन (१९ कोटी), जोगेश्वरी स्टेशन (११९ कोटी), माटुंगा स्टेशन (१७.३ कोटी), परळ स्टेशन (१९.४ कोटी), प्रभादेवी (२१ कोटी), वडाळा स्टेशन (२३ कोटी), भोकर स्टेशन (११.३ कोटी), धर्माबाद स्टेशन (३० कोटी), मुखेड जं.स्टेशन (२३ कोटी), उमरी स्टेशन (८ कोटी), देवळाली स्टेशन (१०.५ कोटी) आदी.

## पुण्यात अमित शाह, फडणवीस, शिंदे यांच्यात चर्चा



पुणे : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुण्यातून रायगडकडे रवाना होण्यापूर्वी पुण्यातील एका हॉटेलमध्ये अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

रायगड दौऱ्यासाठी अमित शाह शुक्रवारी रात्री पुण्यात आले. येथील एका हॉटेलमध्ये त्यांचा मुक्काम होता. याच हॉटेलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची भेट घेतल्याची सूत्रांची माहिती आहे. भेटीत काय चर्चा झाली याची ठोस माहिती मिळालेली नाही. मात्र रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदावर चर्चा झाली असावी असा अंदाज आहे.

### पालकमंत्रिपदावरून तिढा कायम

रायगडचे पालकमंत्रिपद अजित पवारांच्या राष्ट्रवादीला देण्यात आले आहे. मात्र येथे शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांनी दावा केला आहे. अशीच परिस्थिती नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाबाबत झाली आहे. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांना अजूनही पालकमंत्री मिळालेला नाही. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत धुसफूस सुरू आहे. अमित शाह यांच्या आजच्या दौऱ्यात दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटेल असे सांगण्यात येत आहे.

### शाह यांच्या हस्तक्षेपाने तोडगा निघणार?

महायुती सरकार स्थापन होऊन चार ते पाच महिने उलटले तरी या जिल्ह्यांना पालकमंत्री मिळालेले नाहीत. त्यामुळे शाह यांच्या हस्तक्षेपाने अखेर यावर तोडगा निघेल, अशी आशा आहे. आजच्या दौऱ्यात याबाबत निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, रायगड दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांनी शाह यांना स्नेहभोजनाचे निमंत्रण दिले आहे. त्यामुळे या भेटीदरम्यान आणखी काही महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## छत्रपती शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका - अमित शाह

रायगड, १२ एप्रिल (हिं.स.) – आपल्या स्वातंत्र्याला १०० वर्षे होतील तेव्हा आपला देश जगात क्रमांक एकवर असेल, असा संकल्प आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडावरुन करत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजानंतर औरंगजेब आला होता, तोपर्यंत छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, तारा राणी, संताजी, धनाजी या सगळ्यांनी लढा दिला आणि त्याची कबर इथेच बांधली गेली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका. छत्रपती शिवाजी महाराज देशाला आणि जगाला प्रेरणा देणारे आहेत, असे उद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.



छत्रपती शिवरायांची ३४५ वी पुण्यतिथी निमित्त रायगड किल्ल्यावर आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून छत्रपती शिवरायांच्या सिंहासनाचं पूजन करण्यात आले. याशिवाय खासदार उदयनराजे, मंत्री आशिष शेलार आदी उपस्थित होते.

शाह पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांची आज ३४५ वी पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने महाराजांसह राजमाता जिजाऊंना नमन करतो. त्यांनी फक्त शिवरायांना जन्म दिला नाही तर बाल शिवाजीला त्यांनी स्वराज्य हा विचार दिला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक घडवण्याचं काम राजमाता जिजाऊंनी केलं. सुवर्ण सिंहासन ज्या ठिकाणी होतं तिथे मी शिवरायांना अभिवादन केलं. त्यावेळी मनात उचंबळून आलेल्या भावना शब्दांत मांडता येणार नाहीत. स्वराज्य, स्वधर्म यासाठी त्यांना आयुष्य वेचलं. आदिलशाही, निजामशाहीने वेढलेला महाराष्ट्र हिंदवी स्वराज्यात बदलण्याचं काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केलं. त्यानंतर मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावले. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्माच्या वेळी महाराष्ट्र अंध:कारात बुडाला होता. स्वधर्म आणि स्वराज्य याबाबत बोलणं लोक गुन्हा समजू लागले होते. पण शिवरायांनी स्वराज्य स्थापन करण्यासाठी, भगवा फडकवण्यासाठी प्रतिज्ञा घेतली. मी आजवर अनेक नायकांची चरित्रं वाचली आहे. मात्र असं साहस मी एकाहीमध्ये पाहिलं

### पंजाबमध्ये १२७.५४ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

अमृतसर : पंजाब पोलिसांनी अमृतसरच्या घरिंडा पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या खैरा गावातील हिरा सिंग याला अटक करून त्याच्याकडून १८.२२७ किलो हेरॉईन जप्त केली आहे. आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत याचे मूल्य १२७.५४ कोटी रुपये आहे. पंजाब पोलिसांच्या अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (एएनटीएफ) बॉर्डर रेंज यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली आहे. याप्रकरणाच्या तपासात असे आढळले की, हीरा सिंग आणि त्याचा साथीदार कुलविंदर सिंग उर्फ किंडा (गाव दौके, पोलिस स्टेशन घरिंडा) हे पाकिस्तानस्थित ड्रग्ज तस्कर 'बिल्ला' याच्या संपर्कात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार हे दोघेही सीमेपलीकडून हेरॉइनची तस्करी करायचे आणि पंजाबमध्ये ते पुरवायचे. हे हेरॉइन पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे पोहोचवले जात होते किंवा सीमावर्ती भागात निश्चित ठिकाणी सोडले जात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार, हीरा सिंग आणि त्याचा साथीदार हे सामान उचलून राज्याच्या विविध भागात तस्करी करायचे. हीरा सिंगला अटक करण्यात आली असली तरी त्याचा साथीदार कुलविंदर सिंग अजूनही फरार आहे.

## टीजेएसबी बँकेचे २०२४-२५ आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर

### यशस्वी टप्प्यांचा गौरव, एकूण व्यवसायाचा तेवीस हजार कोटींचा टप्पा पार

ठाणे, १० एप्रिल : देशातील बहुराज्यीय सहकारी बँकांपैकी एक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने सलग दहा वर्षांहून अधिक काळ दरवर्षी १० एप्रिल रोजी आर्थिक निकाल जाहीर करण्याची परंपरा जपत आज २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. नव्या कोर बँकिंग प्रणाली (उइड) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवरही बँकेने सातत्य कायम ठेवत पारदर्शकता आणि वेळेवर आर्थिक माहिती सादर केली आहे.

मुख्य आर्थिक ठळक बाबी:
एकूण उलाढाल : २३,१०४.८२ कोटी
ठेवी: १४,८४८.६४ कोटी
कर्जे : ८,२५६.१८ कोटी
ढोबळ नफा: २५२.०७ कोटी
निव्वळ नफा: १८५.३८ कोटी
ढोबळ अनुत्पादित कर्जे : ३.५९%
निव्वळ अनुत्पादित कर्जे: ०%

२०२४-२५ मधील यशस्वी टप्पे:
टीजेएसबी सहकारी बँकेने या वर्षी अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयामुळे आता बँकेला शासकीय अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठीचे खाते आणि निवृत्ती वेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरिता; तसेच सार्वजनिक उपक्रम/ महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकरिता प्राधिकृत मान्यता मिळाली आहे. यावर्षी टीजेएसबी बँकेमध्ये सिटिझन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, गोवा यांचे यशस्वी विलीनीकरण झाले असून, बँकेच्या नेटवर्कमध्ये सहा नवीन शाखांची भर पडली आहे. बँकेने नवीन कोर बँकिंग प्रणाली (उइड) अंमलात आणून ग्राहक अनुभव व कार्यक्षमतेत मोठी सुधारणा केली आहे.

नेतृत्वाचा दृष्टीकोन :
बँकेचे अध्यक्ष श्री. शरद गांगल म्हणाले, या वर्षीची कामगिरी केवळ आमच्या मजबूत आर्थिक पाया सिद्ध करत नाहीतर, सहकारी बँकिंगमधील नवे मापदंडही निश्चित करते. नव्या कोर बँकिंग प्रणालीमुळे व्यवहारांची गती, सुरक्षितता आणि उपलब्धता वाढली आहे. ग्राहक प्रथम हेच आमचे धोरण असून, भविष्यातील नवकल्पनांचा पाया मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ते पुढे म्हणाले, आमचे ध्येय हे सहकारी बँकिंग क्षेत्रात आघाडीवर राहणे आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि वैयक्तिक सेवा यांचे समन्वयाला आमचे प्राधान्य आहे. डिजिटल नवकल्पना, ग्राहक-केंद्रित उपाययोजना आणि धोरणात्मक वाढ यावर आम्ही सतत भर देत आहोत.


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

पाया विश्वासाचा, जोड तंत्रज्ञानाची

लेखापरीक्षित निकाल

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२५ | ३१-०३-२०२४ |
|---|---|---|
| एकूण उलाढाल | २३,१०५ | २२,४६३ |
| ठेवी | १४,८४९ | १४,५८८ |
| कर्जे | ८,२५६ | ७,८७५ |
| ढोबळ नफा | २५२ | २८० |
| निव्वळ नफा | १८५ | २१६ |
| स्वनिधी | १,६३९ | १,७१९ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.५९% | ३.६६% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | ०.००% | ०.००% |
| पुंजी पर्याप्तता | १७.४८% | १७.५७% |

(दिनांक १० एप्रिल २०२५)

www.tjsbbank.co.in | Toll Free 1800 266 3466 | 1800 103 466


## 'वर्षभरात उत्तर मुंबईतील एक लाख युवकांना देणार नोकऱ्या'

मुंबई : वर्षभरात उत्तर मुंबईतील एक लाख तरुणांना नोकऱ्या दिल्या जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणानुसार कोणताही तरुण किंवा महिला बेरोजगार राहणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी कांदिवली (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात दिली.

आमदार योगेश सागर यांनी महाराष्ट्राच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभागाच्या सहकार्याने भुराभाई मैदानावर आयोजित केलेल्या या रोजगार मेळाव्यात तीन हजारहून अधिक उमेदवारांनी नोंदणी करून प्रचंड प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे ६० कंपन्या आणि ६ महामंडळांनी जागेवरच रोजगार उपलब्ध करून देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या मेळाव्यात एक हजारहून अधिक उमेदवारांनी नोकऱ्या मिळवत आयोजकांचे आभार मानले. या रोजगार मेळाव्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे, दरवर्षी तरुणांचा प्रतिसाद वाढत आहे.

'आजच्या तरुणांचा आत्मविश्वास आणि उत्साह पाहून माझी छाती ५६ इंच अभिमानाने फुलली आहे. ही ऊर्जाच नवीन भारताची खरी ताकद आहे, असे म्हणत पीयूष गोयल यांनी आता दरमहा कांदिवली येथील कौशल्य विकास केंद्रात रोजगार मेळावे आयोजित केले जातील आणि लवकरच ठाकूर कॉम्प्लेक्समध्येही तिसरे कौशल्य विकास केंद्र सुरू केले जाईल, अशी घोषणा केली.

'अलिकडेच व्हायरल झालेल्या स्टार्टअप महाकुंभातील पीयूष गोयल यांच्या भाषणाने मी खूप प्रेरित झालो. त्यांच्या संदेशामुळे मला मोठे स्वप्न पाहण्यास आणि उद्योजकता जोपासण्यास प्रोत्साहन मिळाले', असे कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या एका तरुणाने सांगितले. यावेळी गोयल यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्याबाबत बोलताना विरोधकांवर कडाडून टीका केली. काँग्रेस दहशतवाद रोखण्यात अपयशी ठरली. मात्र पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहशतवाद पूर्णपणे उखडून टाकला जाईल, असे गोयल यांनी सांगितले. या रोजगार मेळाव्याला आमदार योगेश सागर, भाजप नेते विनोद शेलार, गणेश खणकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.




CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिक्षक इंगळे जिल्हास्तरीय विज्ञान शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

जिल्हा विज्ञान मंडळ सलग्न महाराष्ट्र राज्य विज्ञान महामंडळाच्यावतीने देण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय डॉ सी.व्ही. रमण विज्ञान शिक्षक पुरस्कार- २०२५ आ प्रवीण स्वामी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

लोहारा तालुक्यातील हाराळी (तोरंबा) येथील ज्ञानप्रबोधिनी विद्या मंदिरात या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भूम तालुक्यातील अंतरगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक सुधीर इंगळे यांना हाराळी (तोरंबा) येथील ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिरात हा पहिला जिल्हास्तरीय विज्ञान पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, महाराष्ट्र राज्य विज्ञान मंडळाचे राज्याध्यक्ष दिनेश पवार, रवि नरहिरे, अभिजीत कापरे केंद्रप्रमुख आदींच्या उपस्थितीत इंगळे यांचा सन्मान करण्यांत आला.

या या कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वाशी तालुक्यात पवनचक्कीचा हैदोस; बेकायदेशीर रित्या उत्खनन

**शासनाच्या शेकडो झाडांची राजरोस कत्तल... वनविभागाचे अक्षम्य दुर्लक्ष... शेकडो टनाच्या वाहतुकीचे रस्ते जमीनदोस्त...**





### नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ एप्रिल -**

वाशी तालुक्यात पवनचक्क्या कंपनीने मोठा हैदोस घातला आहे. परवानगी न घेता रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक, बेकायदेशीर रित्या उत्खनन आणि मोठ्या प्रमाणात रस्त्यालगत असलेल्या झाडांच्या राजरोस कत्तली केल्या जात आहेत. शासनाकडून कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने यामध्ये अधिकारी सामील तर नाहीत ना? असा सवाल नागरिक विचारत आहेत. शासन लाखो रुपये दरवर्षी झाडांच्या लागवडीसाठी खर्च करत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. त्यात आपल्या जिल्ह्याची दुष्काळी भाग म्हणून ओळख आहे. ही दुष्काळी ओळख कायमची पुसण्यासाठी शासनाने



व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षाची लागवड केली आहे. पण आता पवनचक्क्या कंपनीकडून पर्यावरणाचा मोठा ऱ्हास केला जात आहे. शेकडो झाडांच्या खुलेआम कत्तली केल्या जात आहे. शासन एकीकडे झाडे लावा, झाडे जगवा म्हणत आहे. तर दुसरीकडे अश्या प्रकारे झाडांच्या कत्तली केल्या जात आहे. तोडलेल्या झाडांची नुकसान भरपाई शासनाला पवनचक्की कंपनी देणार का? परवानग्या फांद्यांच्या कत्तली झाडाच्या कंपन्यांनी फांद्या तोडण्याच्या परवानगी घेतली असेल तर, प्रत्यक्ष मात्र झाडे तोडली जात आहेत. याकडे संबंधित विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष आहे. येत्या काळात हा पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबला नाही तर पर्यावरणाचे मोठे नुकसान होईल असे, पर्यावरण प्रेमीचे म्हणणे आहे. पवनचक्की उभारण्यासाठी बेकायदेशीर रित्या कंपनीकडून मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात आहे. रस्ते शेकडो किलोमीटर चे रॉयल्टी मात्र फुटाची. पवनचक्क्या उभारण्यासाठी शेकडो किलोमीटरचे रस्ते केले जात आहे. जर कंपन्यांनी शासनाला रॉयल्टी भरली असेल तर, ती फक्त काही मीटर अंतराची प्रत्यक्ष कामे शेकडो किलोमीटर लांबची केली जात आहे. ना त्याचे मोजमाप, ना त्याचा कुठला हिशोब, ना रेकॉर्ड मग महसूल प्रशासन नेमके करते काय? असा सवाल उपस्थित होत आहे. यासंदर्भात तालुक्याचे तहसीलदार प्रकाश मेहेत्रे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नाही. तर पवनचक्की कंपन्यांकडून रस्त्यावर भल्यामोठ्या अवजड वाहनांकडून विना परवानगी वाहतूक केली जात आहे. शासन दरवर्षी तालुक्यातील रस्त्यावर करोडो रुपये खर्च करत आहे. चांगले रस्ते केल्याने अनेक गावे एकमेकांना जोडली जात असून तालुक्यातील दळणवळणाला चालना मिळते. पण आता त्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पवनचक्क्या कंपन्यांकडून रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक केली जात,असल्याने रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून रस्ते जमिनदोस्त झाले आहेत. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुरळा उडत असल्याने नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या संदर्भात काही अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले कंपनीचे काही अधिकारी आमच्याकडे नाहरकत मागण्यांसाठी आले होती आम्ही त्यांना हरकत दिली नाही. मग यानिमित्ताने असा, सवाल उपस्थित होत आहे, की पवनचक्क्या कंपनीची इतकी मग्रुरी वाढली कशी? ना रस्त्यावर वाहतून करण्यासाठी परवानगी, ना झाडे तोडण्यासाठी परवानगी मग कोणाच्या आशीर्वादाने हे प्रकार सुरू आहेत? वाशी तालुक्यात सुरू असलेली पवनचक्की कंपन्यांची मग्रुरी नाही थांबल्यास कंपनीच्या विरोध नागरिक आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. तर जिल्हाधिकारी काय कारवाई करणार पाहणे गरजेचे आहे.

> वाशी तालुक्यात बऱ्याच पवनचक्की कंपनी आल्या आहेत. त्यांच्याकडून विना परवानगी झाडे तोडली जात आहे. रस्त्याचे वाटुळे केले जात आहे. अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष आहे. हे प्रकार थांबले नाहीत तर लोकशाही मार्गाने आंदोलने करण्यात येतील.
> **- सुधीर घोलप,** भाजप वाशी तालुका सरचिटणीस

> पवनचक्की कंपन्यांचे आमच्याकडे नाहरकत साठी प्रस्ताव आले होते. त्यांनी कागदाची पूर्तता न केल्यामुळे आपण त्यांना काम चालू करा म्हणून काय हरकत दिली नाही. पवनचक्की कंपनीने परस्पर आपल्या रस्त्यावर नासधूस केली असेल तर तालुक्याचे इंजिनिअरिंग पवार यांना मी सांगितले आहे,की ९५ क्र.ची कंपनीला नोटीस आजच्या आज काढून चौकशी करून अहवाल सादर करावा अश्या सूचना दिल्या आहेत. परस्पर कामे केली असतील तर पवनचक्की कंपनीकडून भरपाई घेण्यात येईल. आमच्याकडून कुठलीही परवानगी देण्यात आली नाही.
> **- अमोल काळे,** उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद विभाग

> पवनचक्की कंपन्यांकडून जिल्हा परिषद रस्त्याचा वापर चालू आहे. मोठ्या प्रमाणात रस्ते खराब झाले आहेत. तसेच रस्त्या लगत झाडांची वृक्ष तोड चालू आहे. बेकायदेशीर रित्या उत्खन केले जात. जिल्हा परिषद रस्त्याची परवानगी न घेता बेकायदेशीर कामे केली जात आहे. यात सर्व अधिकारी सामील असून सर्वांची मिली भगत सुरू आहे. हा प्रकार नाही थांबल्यास पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात आंदोलन केले जाईल.
> **- उद्धव साळवी,** जिल्हा परिषद सदस्य तेरखेडा

## संक्षिप्त वृत्त...



### भाजपा कार्यालयात फुले जयंती साजरी

**परंडा, दि.११ एप्रिल -**

महिला शिक्षण आणि समानतेच्या अधिकारासाठी आयुष्यभर लढणारे सामाजिक क्रांती आणि स्त्री शिक्षणाचे प्रणेते क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त परंडा येथे भाजपा संपर्क कार्यालयात भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर याच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. जहीर चौधरी, भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष सुर्यवंशी, भाजपा तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, उमाकांत गोरे, मिलिंद शिंदे, अविनाश विधाते, ॲड. तानाजी वाघमारे, ॲड. भालचंद्र औसरे, धनंजय काळे, मनोहर पवार, अमर ठाकूर, सुरज काळे, शिवम भातलवंडे, समरजीतसिंह ठाकूर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### माळकरंजा शाळेत फुले यांना अभिवादन

**कळंब/माळकरंजा, दि.११ एप्रिल -**

जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपापल्या वाणीतून महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी शालेय मंत्रिमंडळातील सर्व सदस्य मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्वांनीच या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. शाळेचे सहशिक्षक मकरंद नाडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवन चरित्रावर सविस्तर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना अनेक बाबी समजावून दिल्या. शाळेचे मुख्याध्यापक संतोष भोजने यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी सहशिक्षिका भारती सूर्यवंशी, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मंजुश्री कराड या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विराज शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन अजिंक्य वटाणे यांनी केले.

### उंडरगावात हनुमान जयंतीनिमित्त किर्तन

**लोहारा, दि.११ एप्रिल -**

सालाबादप्रमाणे याही वर्षी हनुमान जयंतीचे औचित्य साधून युवा किर्तन सम्राट हभप. पठाडे महाराज कर्जत



यांची सेवा आयोजित करण्यात आली असून भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उंडरगाव ग्रामस्थांनी केले आहे. तालुक्यातील उंडरगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदा ही हनुमान जयंतीचे औचित्य साधून दि.१२ रोजी सकाळी ६ वाजता हनुमान जन्मोत्सवानिमित गुलाल उधळन, रात्री ७ वाजता दारुची आतिषबाजी. त्यानंतर लागलीच ९ वाजता ज्ञानप्रबोधनकार किर्तन सम्राट हभप. ज्ञानेश्वर माऊली पठाडे महाराज कर्जत यांच्या बरोबर वारकऱ्यांचा जनसमुदाय उपस्थित राहाणार असुन या युवा किर्तनाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उंडरगाव यात्रा कमिटीसह ग्रामस्थांनी केले आहे.



### रक्तदान शिबिरात ६५ रक्तदात्यांचे रक्तदान

**तुळजापूर, दि.११ एप्रिल -**

येथील न.प.प्रा. शाळा क्रमांक १ चे तत्कालीन मुख्याध्यापक कै. दिगंबरराव किसनराव कावरे गुरुजी यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन जयश्री कंदले, सचिन पाटील, अमर हंगरगेकर, विनोद पलंगे, प्रा. सतिश बिडवे, जया सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी दिलीप बनसोडे उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी महेंद्र कावरे, शहाजी कावरे, प्रा.डॉ. प्रशांत भागवत, जगदीश पलंगे, निरंजन डाके, रामेश्वर आपुणे, प्रमोद चौधरी, बालाजी कामे,विशाल सूर्यवंशी, सार्थक बिडवे, सार्थक कावरे, स्वराज्य कावरे आदींनी परिश्रम घेतले.

### आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर आज तुळजापूरात

**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी



पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बाल विकास व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर ह्या १२ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. सकाळी ६.४५ वा. तुळजापूर येथे आगमन व राखीव. सकाळी ७ वा. श्री तुळजाभवानी मंदिर येथे महापूजा करतील. सकाळी ८ वा. शासकीय विश्रामगृहकडे प्रयाण व सकाळी ८.१५ वा. विश्रामगृह येथे आगमन व राखीव.

## उमरगा येथे गावठी पिस्टल, घातक शस्त्रासह आरोपी जेरबंद

**उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याची कामगिरी**





**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ एप्रिल -**

उमरगा उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दमदार कामगिरी करत एक गावठी पिस्टल, ४ जिवंत राऊंड, ६ कोयते व १ सुरी असे घातक शस्त्र व वाहनासह २ लाख ५३ हजार ५०० रुपये मुद्देमालासह एका आरोपीस जेरबंद केले.

या प्रकरणी पोलिस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, दि.१० रोजी दुपारी सदाशिव शेलार उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग उमरगा यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा समोरील बाजुस असलेल्या ड्रिम हाऊस कॅफे मध्ये कार (क्र.एमएच २५/एबी ६२७९) मध्ये आलेल्या काळा शर्ट घातलेल्या व्यक्तीच्या कमरेमध्ये एक पिस्टल आहे. तो कॅफच्या वरच्या मजल्यावर बसलेला आहे. ही माहिती मिळताच तत्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा यांनी पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले, पोउपनि. अनुसया माने, पोहेकॉ. बोयणे, पोहेकॉ. सोनवणे, पोना. अवचार, पोकॉ. थोरे, कांबळे, जाधव यांना छापा टाकण्याबाबत आदेश देवुन कारवाई करीता पाठविले. अधिकारी व अंमलदार यांनी दुपारी २.१५ ड्रिम हाऊस कॅफमध्ये पंचासह जाऊन सदर व्यक्तीस ताब्यात घेतले. त्याने त्याचे नांव सुशील संतोष शहापुरे (वय २३ रा. तुरोरी ता. उमरगा) असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक २५ हजार रूपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्टल व ४ जिवंत राऊंड मिळुन आले. तसेच (एमएच २५/एबी ६२७९) कारच्या डिक्कीमध्ये ३५०० रू. किमतीचे ६ कोयते व एक सुरा असे अवैध हत्यार विना पासपरवाना बाळगल्याचे मिळुन आले. पोलिसांनी कार सह एकुण २ लाख ७८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूध्द उमरगा पोलिस ठाण्यात शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला असुन आरोपीस जेरबंद केले.

या प्रकरणाचा तपास सपोनि. पांडुरंग कन्हेरे करीत आहेत.

## आलियाबाद शिवारात वादळी वाऱ्यासह गारपीट; आंब्याच्या झाडांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ एप्रिल -**

वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीने आलियाबाद शिवारातील गट नं.२२ मधील मनिषा गुंडु पवार यांच्या आंबा बागेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असुन आंब्याची झाडे मुळासकट उन्मळुन पडले आहेत.

दि.१० एप्रिल रोजी सायंकाळ अचानक आकाशात ढग जमा झाले आणि विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस सुरु झाला. होर्टी, जळकोट, आलियाबाद शिवार नळदुर्ग शहराच्या जवळ हा गारांचा पाऊस झाला. वादळी वारे तसेच गारांच्या पावसामुळे फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे.

आलियाबाद शिवारातील गट नं.२२ मधील मनिषा गुंडु पवार यांच्या आंबा बागेचे वादळी वारे व गारपिटीने मोठे नुकसान झाले आहे. आंब्याला चांगल्या प्रकारची आंबे लागली होती. मात्र या गारपिटीने मोठया प्रमाणात आंब्याची गळती झाली आहे. त्याचबरोबर अनेक आंब्याची झाडे मुळासकट उन्मळुन पडले आहेत.

प्रशासनाने तात्काळ या नुकसानीचे बांधावर येऊन पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मनिषा पवार यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

## जयप्रकाश विद्यालयात उजास उपक्रमांतर्गत सॅनिटरी पॅडचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे उजास उपक्रमांतर्गत सॅनिटरी पॅडचे मुलींना मोफत वाटप करण्यात आले.

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेच्या उजास या उपक्रमांतर्गत श्रीमती वैष्णवी सावंत (फॅसिलीटेटर, धाराशिव जिल्हा) यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सत्राच्या माध्यमातून मासिक पाळी संदर्भातील गैरसमजुती व त्याबद्दल जनजागृती करण्यात आली. जनजागृतीमुळे मासिक पाळीतील अंधश्रद्धा व गैरसमज दूर होऊन त्याची काळजी घेण्यास मदत होते. कापड किंवा कापडी पॅड व सॅनिटरी पॅड या दोन्हीचे फायदे तोटे त्यांची निवड करणे व त्याचा वापर करताना घ्यावयाची काळजी, वयोमानानुसार शारीरिक बदल या सर्वांची सखोल माहिती या प्रसंगी त्यांनी दिली. त्यातीलच एक मासिक पाळी होय त्यावरील उपाय व व्यायामाचे महत्त्व सांगितले.

यावेळी चौरस आहार घेणेही तेवढेच आवश्यक आहे. याची सखोल माहिती विद्यार्थिनींना सांगितली. विद्यालयातील मुलींसाठी ८००० सॅनिटरी पॅड मिळाले. विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या मागणीला व सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे केंद्रप्रमुख दुधंबे, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अभिजीत घोळवे यांनी मानले.

## जळकोट जळीतग्रस्त कुटुंबाला आ. राणादादांकडून मदत



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.११ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रेमनाथ चौकातील रहिवाशी गणेश मधुकरराव कदम यांच्या राहत्या घराला रंगपंचमीदिवशी आग लागून संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले होते. या जळीतग्रस्त कुटुंबाला तुळजापूर तालुक्याचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी ११ हजार रुपयाची मदत केली आहे.

या मदतीचा धनादेश कृषि उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन ॲड. आशिष सोनटक्के यांनी आ. पाटील यांच्यावतीने गणेश कदम यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयाकडे सुपुर्द केला. यावेळी आ. पाटील यांनी मुंबई येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे गणेश कदम यांच्याशी संवाद साधून धीर दिला व आगीसंदर्भात पंचनामा झाला का? तसेच पुढील प्रक्रिया कुठपर्यंत आहे. याची माहिती जाणून घेतली. यावेळी शासनस्तरावर यासाठी जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली.

यावेळी ब्रह्मानंद कदम, नागनाथ किलजे, एकनाथ पाटील, विठ्ठल कदम, नागराज जाधव, सुदीप चौधरी, पिंटू कदम, दयानंद कदम, बसवराज धरणे आदि उपस्थित होते. यावेळी आ. पाटील यांचे व आशिष सोनटक्के यांचे मेघराज किलजे यांनी कदम कुटुंबियांच्यावतीने आभार मानले.

## डॉ. संजय जहागीरदार, विशाल काशीद, हिमालय वाघमारे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ एप्रिल -**

डॉ. संजय जहागीरदार, विशाल काशीद, हिमालय विजय वाघमारे यांची कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय संस्था), परंडा, जि. धाराशिव येथे महाराष्ट्र शासनाने (संस्था व्यवस्थापन समिती) सदस्य, IMC मेंबर म्हणून नियुक्ती झाली.

याबद्दल भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूरसाहेब यांनी भाजपा संपर्क कार्यालय परंडा येथे सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी ॲड. झहीर चौधरी, समरजीतसिंह ठाकूर, अविनाश विधाते, साहेबराव पाडुळे, बाबासाहेब जाधव, डॉ. आनंद मोरे, आप्पा मुसळे, गजानन तिवारी, धनंजय काळे, गौरव पाटील, मनोज पवार, सिध्दीक हन्नुरे, सुरज काळे, आकाश मदने, व्यंकटेश दिक्षित, समाधान कोळेकर, ज्योती भातलवंडे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



आज श्री. शांतीलाल देवलाल जयस्वाल बोरगाव बाजार यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगीरीच्या गौरवार्थ हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे (स्वतंत्र सैनिक) महाराष्ट्र शासन सन्मान पत्र मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी श्री.दिलीप स्वामी यांच्या आदेशाने उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण व तहसीलदार संजय भोसले यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी नंदकिशोर जैस्वाल जय जैस्वाल जितेंद्र जैस्वाल वकील तायडे दत्तु ढोरमारे बालाजी काथार हाजर होते.

## एल्जीच्या कॉम्प्रेस्ड एअर सिस्टीमसह मॅन+हम्मेल खर्च कमी करते

मुंबई : फिल्ट्रेशन सिस्टम प्रदान करण्यात जागतिक आघाडीच्या मॅन+हम्मेलने एल्जी इक्विपमेंट्स लिमिटेड (बीएसईः ५२२०७४ एन एस ईः एल्जी इक्विपमेंट्स) ची उपकंपनी असलेल्या पॅटन्स इंक., यूएसए सोबत भागीदारीत त्यांच्या कॉम्प्रेस्ड एअर सिस्टममध्ये यशस्वीरित्या सुधारणा केली आहे. एल्जी च्या प्रगत एअर कॉम्प्रेसर आणि ड्रायर्सद्वारे समर्थित या नवीन सिस्टममुळे खर्चात मोठी बचत झाली आहे, उत्पादन कार्यक्षमता सुधारली आहे आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढली आहे, ज्यामुळे मॅन+हम्मेलच्या उत्पादन ऑपरेशन्समध्ये बदल झाला आहे. मॅन+हम्मेल ऑटोमोटिव्ह, शेती, बांधकाम, डेटा सेंटर, ऊर्जा, अन्न आणि पेये आणि इतर अनेक उद्योगांना सेवा देते. कंपनी तिच्या उत्पादन प्रक्रियेत कॉम्प्रेस्ड एअर आणि स्वच्छ पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होती आणि कालबाह्य आणि अनेकदा दोषपूर्ण एअर कॉम्प्रेशन सिस्टममुळे दररोज २० हून अधिक एअर-संबंधित डाउनटाइम घटना घडल्या आणि तासाला ३० गॅलन दूषित पाणी. यामुळे कंपनीला दरवर्षी १६०,००० पेक्षा जास्त नुकसान सहन करावे लागत होते, ज्यामुळे विलंब होतो, संसाधनांचा अपव्यय होतो आणि पुरवठा साखळीतील अडचणी वाढतात.

## दृष्टी दुर्लक्ष दूर करण्यासाठी लेन्सकार्टने मोफत लेन्स बदलण्याचा कार्यक्रम सुरू

मुंबई : मोठ्या संख्येने भारतीय जुने चष्मे घालतात - स्वतःच्या इच्छेने नाही, तर लेन्स बदलणे हे अनेकदा महाग आणि गैरसोयीचे मानले जाते म्हणून. तथापि, नेत्र आरोग्य व्यावसायिक चेतावणी देतात की लेन्स अपडेट करणे पुढे ढकलल्याने डोळ्यांवर सतत ताण येऊ शकतो, डोकेदुखी होऊ शकते, दृष्टी अंधुक होऊ शकते आणि उत्पादकता कमी होऊ शकते. ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींसाठी, वयानुसार धोका वाढतो. बऱ्याच लोकांना प्रेस्बायोपिया होऊ लागतो - ही एक नैसर्गिक, वयाशी संबंधित स्थिती आहे ज्यामध्ये डोळ्याच्या लेन्सची लवचिकता कमी होते, ज्यामुळे जवळच्या वस्तूंवर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. जर प्रीस्बायोपिया दुरुस्त न केल्यास, त्याचा दैनंदिन कामगिरी आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. नवीन लेन्स आणि फ्रेम्स महाग असल्याने प्रिस्क्रिप्शन अपडेट्स मिळण्यास अनेकदा विलंब होतो, ज्याची किंमत १,५०० ते ५,००० पर्यंत असू शकते. डोळ्यांच्या आरोग्यसेवेच्या या दुर्लक्षित समस्येचे निराकरण करण्यासाठी, लेन्सकार्टने एक मोफत लेन्स बदलण्याचा कार्यक्रम सुरू केला आहे - लाखो लोकांसाठी आवश्यक दृष्टी काळजी अधिक सुलभ करण्यासाठी डिझाइन केलेला हा पहिलाच उपक्रम आहे. देशभरातील लेन्सकार्टच्या २०००+ स्टोअरमध्ये उपलब्ध असलेला हा कार्यक्रम कोणत्याही ब्रँडच्या फ्रेमसाठी मोफत रिप्लेसमेंट लेन्स देतो, ज्यामध्ये व्यावसायिक फिटिंग फक्त १९९ मध्ये उपलब्ध आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे महात्मा जोतिबा फुले यांचे जयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि.१२ एप्रिल पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच .सलीम महंमद पठाण ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करुन जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण, अंगणवाडी सेविका रेखा इंदापुरे,कोमल निकम,रविंद्र गोरे,अहेमद पठाण,अशोक गोरे, संदिप चाव्हरे,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने महिला व गावकरी आदींची उपस्थित होते.

# काँग्रेस कमिटीची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ :- पैठण येथे आज प तालुका व शहर काँग्रेस कमिटीची आढावा बैठक पक्ष निरीक्षक माजी खासदार तुकाराम रेगे पाटील, आमदार तथा निरीक्षक राजेश राठोड,खासदार तथा जिल्हा अध्यक्ष डॉ कल्याण काळे ,प्रदेश सरचिटनीस खालेद पठाण, प्रदेश सरचिटणीस प्रकाश मुगदीया , जिल्हा उपाध्यक्ष किरण डोनगावकर तालुका अध्यक्ष विनोद पा तांबे,शहर अध्यक्ष निमेश पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली .



या वेळी खासदार डॉ कल्याण काळे ,पक्ष निरीक्षक तुकाराम रेगे, आमदार राजेश राठोड,मराठवाडा ओ बी सी अध्यक्ष कंचनकुमार चाटे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून पक्ष संघटना वाढविण्याचे आव्हान केले या वेळी आढावा बैठकीसाठी माजी सभापती मोहंमद हनीफ,रामनाथ चोरमले,माजी नगरसेवक रफिक कादरी,हमीद खान सर,संभाजी काटे,योगेश जोशी,सदानंद खडसन,रवींद्र आम्ले,मुश्ताक पठाण, रावसाहेब नाडे मुख्तार पठाण,भीमराव नवगिरे,इम्रान पठाण,प्रकाश निवारे,ड.रमेश गव्हाणे,दत्ता फासाटे,आशिष पवार,योगेश टेकाळे, आबेद पठाण, शिवा संदलसे,अनिल मगरे,बाबासाहेब पठाडे,बिलाल शेख,आदिल शेख, बबरू कदम,मंगेश काळे,प्राचार्य सुरेश पाटील,दिनेश माळवे,दादू पटेल,सोमनाथ दारूनकर बबलू शेख,संतोष मिस्त्री, गणेश बुरकुले,दिलीप सनवे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.प्रास्ताविक विनोद तांबे व आभार निमेश पटेल यांनी मानले

# एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न

## 'लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' विषयावर मान्यवरांनी मांडले विचार

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कॉलेज ऑफ कॅम्युनिकेशन, कल्चर आणि मिडिया आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या विषयावरील एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आज आर्यभट्ट सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले.



यावेळी वरिष्ठ पत्रकार निरंजन टकले, एबीपी माझाचे पत्रकार प्रसन्न जोशी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरु प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना वरिष्ठ पत्रकार निरंजन टकले म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले आहे. केंद्र सरकारकडून जनसुरक्षा विधेयक आणले जात असून हे भयंकर आहे. एखाद्या मंत्रालयाच्या विभागाचे, अधिकाऱ्याचे नाव छापायचे असेल तर परवानगी घ्यावी लागेल. ही परवानगी मिळाली तरच आपल्याला त्यांचे नाव छापता येईल. आपल्याला दिसणाऱ्या गोष्टी मांडायच्या नाहीत तर मग काय? सरकार विरोधी असणे म्हणजे देशाविरोधी असणे नाही.

आपल्याला संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आपण वापरणार आहोत की नाही ? आपल्याला असलेला अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा अधिकार आपण वापरला पाहिजे. यामध्ये संचार स्वातंत्र्य, जगण्याचे स्वातंत्र्य, वाचण्याचे, शिकण्याचे, लिहिण्याचे अशा प्रत्येक स्वातंत्र्याची फळे आपण रोज चाकली पाहिजेत. ती नाही चाकली तर आपण गुलामगिरीच्या वाटेवरून चालावे लागेल. संविधानिक कर्तव्य तर आपण बजावत सरकार आणि नेते बजावत आहेत की नाही यावरही लक्ष ठेवायचे असल्याचे वरिष्ठ पत्रकार निरंजन टकले यांनी सांगितले.

यावेळी पत्रकार प्रसन्न जोशी म्हणाले, भारतामध्ये दररोज १८९ भाषांमध्ये २२००० वृत्तपत्र प्रसिद्ध होतात. तसेच आपल्या येथे ९०० दूरचित्रवाहिन्या असून यातील ३५० वृत्तवाहिन्या आहेत आणि याबरोबरच ८५० एफएम रेडियो आपल्याकडे आहेत. मीडिया हा ट्रस्टी, कोऑपरेटीव्ह आणि प्रायव्हेट लोक अशा तीन प्रकारे चालवला जातो. विशेषतः मीडिया हा नेहमीच कार्पोरेट राहिलेला आहे.

स्वतंत्र पत्रकारिता यशस्वीपणे चालवली जाऊ शकते मात्र, सुरुवातीला आपल्याला माध्यमांची आर्थिक गणिते समजून घेतली पाहिजेत. आज अनेकांनी टीव्ही चॅनेल बंद करून ते डिजिटलमध्ये आले आहेत. डिजिटल मीडियामध्ये वितरणाच्या खर्च नसतो मात्र, येथे अल्गोरिदम आणि लोकांची आवड या दोन गोष्टींची अडचण आहे. या माध्यमात ही गरज लक्षात घेऊन अधिक व्हिवज् साठी काहीही प्रसिद्ध केले जात आहे. यातून जाहिरातीचे गणिते मांडली जात असल्याचे पत्रकार प्रसन्न जोशी यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रिहाना सय्यद यांनी केले तर आभार डॉ.रामेश्वर कणसे यांनी मानले.


# खा. संदिपान भुमरे यांचा भव्य नागरी सत्कार संपन्न

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील वेरूळ सर्कल सुलतानपूर सर्कल बाजार सावंगी सर्कल या ठिकाणच्या प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा बैठक व कार्यकर्ता मेळावा व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला यावेळी काही युवक कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला बाजार सावंगी येथे शिवसेना पक्षाच्या वतीने आढावा बैठक घेण्यात आली यावेळी उपजिल्हाप्रमुख दिलीप सिंग राजपूत, गंगापूर तालुकाप्रमुख दिलीप भाऊ निरफळ, डॉक्टर शिवाजी नीळ



, किशोर बापु कुकलारे, रत्नपुर तालुका प्रमुख विशाल खोसरे, वेरूळ माजी सरपंच प्रकाश पाटील मिसाळ कैलास मिसाळ पाटील दादासाहेब पाटील निकम निखिल चव्हाण, शहर प्रमुख नरेंद्र साळुंखे, युवा सेना तालुकाप्रमुख युवराज नलावडे उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर दांडेकर उप तालुका प्रमुख मनोहर वाकळे विभाग प्रमुख अनिल जाधव प्रसिद्धीप्रमुख गणेश माचवे विभाग प्रमुख कृष्णा गायकवाड युवा सेना विभाग प्रमुख तुषार आहेवाड उपविभाग प्रमुख सतीश कामठे ,गजानन आघाडे,विशाल शिंदे, कृष्णा काटकर ,अमोल राऊत, राजेंद्र कसारे, हर्षल हिवर्डे, अरविंद दांडेकर आजिनाथ खंडागळे, अविनाश निकम संजय निकम, पुंजाजी अण्णा नलावडे वसंतराव नलावडे भिकन घुले लोणी सरपंच - संतोष शेषराव दांडेकर , ग्रामपंचायत सदस्य - घनश्याम वाडेकर डॉक्टर असेफ पटेल, गोविंद दांडेकर, बंडू ठोंबरे, बोडखा - ऋषिकेश कदम, रवींद्र खंबाट ,नवनाथ लोंढे, योगेश लोंढे ,सुभाष खरात, विलास पवार ,सौरभ दानकर ,भगवान लोंढे, सावखेडा - आजिनाथ कणके, विजय नाके, दीपक काटकर, मदन कणके ,कारभारी कणके ,अशोक नाके ,संतोष अहिरे ,कय्युम शहा ,दीपक नाके, संतोष कणके , कनकशिळ - संतोष नाना कामठे, रमेश आप्पाराव कामठे, आकाश तांगडे,

## संघ हीच जीवनगाथा



अलकः-८८ राष्ट्रीय मार्गदर्शन


१९४७ साली ब्रिटिश सत्ता भारतातून नष्ट झाली तरी पण गोवा पोर्तुगीजांच्या, हैदराबाद निजामाच्या अधिपत्याखाली होता. या दोन्ही ठिकाणी मुक्ती आंदोलन सुरू होते. अखेर १७ सप्टेंबर १९४८ साली हैदराबादच्या निजामाने शरणागती पत्करली. त्यावेळच्योशिरीळेप झजडज यासाठी सरदार वल्लभ भाई व श्री गुरुजी यांच्यात वार्तालाप होऊन दिशा ठरली होती. तसेच गोवा मुक्तीच्या बाबतीत श्री. गुरुजींच्या भावना अतिशय तीव्र होत्या. सुधीर फडके व श्री गुरुजी यांच्यात बातचीत होऊन १९५५ साली संघाच्या काही तेजस्वी तरुणांनी सशस्त्र क्रांती करून दादरा नगर हवेली ची मुक्तता प्रत्यक्षात घडवून आणली होती. यात सुधीर फडके, मोहन रानडे, डॉक्टर पुंडलिक गायतोंडे असे अनेक तरुण सहभागी झाले होते. आणि १९६२ ला भारतीय सेनेने गोव्यात तिरंगा फडकवला होता, परंतु गोव्याचे वेगळे अस्तित्व व वेगळी संस्कृती मान्य करून. तेव्हा श्री गुरुजींनी ठणकावून सांगितले की सगळ्या भारताची संस्कृती एकच आहे वेगळी संस्कृती गोव्यात असेल तर ती पोर्तुगीजांची होती.

हीच गोष्ट काश्मीर बाबत. खरं म्हणजे काश्मीरचे महाराज

हरीसिंग यांना स्वतंत्र भारतात मानाचे पद मिळणे ही आवश्यक गरज होती. पण पंडित नेहरूंनी याला नकार दिला. ते शेख अब्दुल्लांचा कैवार घेऊन अडून बसले होते. पण तरीसुद्धा आज नाही उद्या काश्मीर भारताचे सर्वांगानी होईल असा भविष्यातील विचार करून श्री गुरुजींनी महाराजा हरिसिंग यांना विलीनीकरणास तयार केले. व २६ ऑक्टोबर १९४७ रोजी हरिसिंग यांनी सही केली. परंतु पंडित नेहरूंनी शेख अब्दुल्लाला प्रधानमंत्री चा दर्जा दिला. काश्मीरचेही वेगळेपण नेहरूंनी कायम ठेवले आणि तिथे दोन ध्वजाला मान्यता दिली. परंतु आज पंतप्रधान मोदींनी काश्मीरचे ३७० कलम व ३५- हे कलम रद्द करून श्री. गुरुजींची इच्छा पूर्ण केली आहे.

परंतु दुर्दैवाने एक देश मे दो निशान, दो विधान, दो प्रधान नही चलेंगे अशी घोषणा देणाऱ्या शामाप्रसाद मुखर्जींना पंडित नेहरूंनी जेलमध्ये टाकले व तिथेच त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर फोनः-०२४३५-२२१०२४**

जा.क्र.२०२५/जमा-२./कुळ/कावी- ६१२ दिनांक ०९.०४.२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे नरसिंगपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती जिजाबाई हरीचंद्र बैलम रा कन्नड यांनी मौजे श्रीमती जिजाबाई हरीचंद्र बैलम रा कन्नडनरसिंगपुर गट क्र ०२ मधील क्षेत्र ०.४० हे आर जमिनीवरील इतर अधिकारातील प्रतिबंधीत सत्ता प्रकार सक्षम प्रधिकारी यांच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरण बंदी कुळ कायदयाने प्राप्त जमीन ची नोंद कमी करुन भोगवटादार वर्ग २ चा ७/१२ वर्ग १ करणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

- तहसिलदार, कन्नड

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार सुरेश पोपट केरे रा. साई कॉलनी, शिवाजीनगर वाळुज ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे खडकनारळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत जमिन गट क्र.११९, एकुण क्षेत्रफळ ३ हे. ३२ आर. पैकी १) प्रीतेश मनोज मुथीयान रा. रेणुका माता मंदिराजवळ, न्यु श्रेय नगर छत्रपती संभाजीनगर, २) साधना किशोर धाडीवाल रा. प्लॉट नं.५३, संस्कार समर्थन नगर, छत्रपती संभाजीनगर, ३) संगिता मनोज मुथीयान रा. डी-४, दिशा अलंकार, कॅनॉट प्लेस छत्रपती संभाजीनगर, ४) विकास रविंद्र पटेल रा. फ्लॅट नं.१२, घर न.४-१-३३, खाराकुँवा, छत्रपती संभाजीनगर यांच्या सामाईक मालकी व ताब्यातील ०.५८.०० आर शेत जमिन खरेदीने घेण्याचा करार जमिन मालकांसोबत केलेला असुन सदर जमिन मालकांनी सदरील मिळकत ही निर्वावाद र्निजोखीम असल्याची ग्वाही माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध उदा. गहान, तारण, बक्षिस, हिस्सा, साडीचोळी अथवा इतर पध्दतीचे हक्क असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप ०७ दिवसात माझ्या खालील पत्यावर लेखी स्वरुपात कागदपत्रांसह दाखल करावा, मुदतीनंतर माझे पक्षकार सदर मिळकती बाबतचा व्यवहार पुर्ण करतील. कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून हे जाहीर प्रगटण प्रसिध्द करीत आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे खडकनारळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत जमिन गट क्र. ११९, एकुण क्षेत्रफळ ३ हे. ३२ आर. पैकी १) प्रीतेश मनोज मुथीयान रा. रेणुका माता मंदिराजवळ, न्यु श्रेय नगर छत्रपती संभाजीनगर, २) साधना किशोर धाडीवाल रा. प्लॉट नं.५३, संस्कार समर्थन नगर, छत्रपती संभाजीनगर, ३) संगिता मनोज मुथीयान रा. डी-४, दिशा अलंकार, कॅनॉट प्लेस छत्रपती संभाजीनगर, ४) विकास रविंद्र पटेल रा. फ्लॅट नं.१२, घर न.४-१-३३, खाराकुँवा, छत्रपती संभाजीनगर यांच्या सामाईक मालकी व ताब्यातील ०.५८.०० आर शेत जमिन जिच्या चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस - खंडू शेलार व सुवर्णा मुंडदा यांची जमिन,
पश्चिमेस - नवनाथ गायकवाड यांची जमिन,
दक्षिणेस - लासुर छत्रपती संभाजीनगर हायवे
उत्तरेस - शेलार यांची जमिन,
दिनांक १२/०४/२०२५

करीता हे जाहीर प्रगटण जाहीर प्रगटन देणार मार्फत
ॲड. डी. ई. पानकडे
D. E. PANKADE
B.A.L..LL.B.
ADVOCATE, LEGAL ADVISOR
BULDHANA URBAN CO-OP SOCI.LTD. MAHARASHTRA
GRAMAIN BANK TQ. GANGAPUR DIST. AURANGABAD
Mob No. 9860170436

### जाहीर प्रगटन

मिळकत मौजे देवळाई ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील प्लॉट नं. ४०, क्षेत्र १११.५२ चौ.मी. गंगोत्रीनगर गट नं. ५६ बाबत.

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार शोयब कदीर देशमुख, रा. सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना वासे खान पिता आरिफ खान रा. सिल्क मिल कॉलनी, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी त्यांची मिळकत मोजे देवळाई ता.जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा हद्दीतील गट नं. ८६ मधील गंगोत्रीनगरचा प्लॉट नं. ४० ज्याचे क्षेत्रफळ ३० बाय ४० म्हणजे १२०० चौ. फुट ज्याचे चौ. मी. १११.५२ होतात व नियमितीकरण दाखल्यानुसार भूखंडाचे क्षेत्र १०४.६६५ चौ. मी. प्लॉट कायमस्वरुपी विक्री करण्याचा तोंडी करार केलेला आहे.

सदरील प्लॉट नं. ४० ची चतुःसिमा खालील प्रमाणे.
पुर्वेस : प्लॉट नं. ४५
पश्चिमेस : १५ फुटाचा रस्ता
दक्षिणेस : २० फुटाचा रस्ता
उत्तरेस : प्लॉट नं. ४१

सदरील मिळकत अकृषिक आदेश जा.क्र. २०२०/जमा-२/परि.४२-क/प्र.क्र.३१ दिनाक ३/३/२०२० अन्वये म.ज.म.अ.१९६६ चे कलम ४२ (क) मधील तरतुदी अन्वये अकृषिक करण्यात आलेली आहे व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा यांचेकडील परवाना क्र. २०५९/२०२१-२२, फाईल क्र. ६६९/१७.११.२१ दिनांक ३०/१२/२०२१ अन्वये नियमीत करण्यात आलेली आहे. असे वरील उल्लेखीत विक्री करणार यांनी आश्वासन दिले आहे. सदरील प्लॉट मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असुन दोषमुक्त आहे व कसल्याही प्रकारची कोणाचाही हितसंबंध नाही. असे कळविलेले आहे. येणेप्रमाणे सदर प्लॉट मिळकतीबाबत किंवा कसल्याही प्रकारचा कोणाचाही आक्षेप/उजर, हितसंबंध असेल किंवा कोणत्याही प्रकारचे व्यवहार किंवा करार, विक्री, दान, गहाण, तारण, लिज, बांध, चर्तुसिमा, सिमा हद्दी चोळी बागडी इत्यादी असल्यास किंवा कोणत्याही कारणाने आक्षेप असल्यास मिळकतीशी किंवा व्यवहाराशी असलेले हितसंबंध / आक्षेप खालील दिलेल्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (७) दिवसाच्या आत आपले आक्षेप/उजर नोंदवावा. सदरील मुदतीत कोणताही आक्षेप / उजर न आल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्विवाद व दोषमुक्त व वरील उल्लेखित मालक व्यतिरिक्त कोणताही मालकी हक्क नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर कोणताही उजर/ आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

दिनांक : ११/०४/२०२५
ठिकाण : सोयगांव

**ॲड. पी.एम चौधरी**
**कार्यालय : बस स्थानक जवळ सोयगांव ता. सोयगांव जि. औवंगाबाद**
**मी.९११२११०३७८**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३०९/२०२५

अर्जदार : १. सोमनाथ कुंडलिक उदमल्ले, २. गंगुबाई भ्र. कुंडलिक उदमल्ले, ३. बिजलाबाई गणेश उर्फ गणपत उदमल्ले, ४. जयश्री भ्र.प्रकाश वाघ, रा.श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर जि.अ.नगर ५. राजश्री भ्र. विशाल झिंझुर्डे, रा.शिऊर, ता.वैजापुर, जि. औरंगाबाद ६. किरण गणेश उर्फ गणपत उदमल्ले, अर्जदार नं. १ ते ३ व ६ रा. मांजरी, ता. गंगापुर. जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले (मयत) यांचे मुळगाव मांजरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद असुन कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले यांचा दि.०१/१०/२०२४ रोजी मौजे मांजरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले यांचा मुलगा नामे गणेश उर्फ गणपत कुंडलिक उदमल्ले यांचा दि.२९/०६/२००९ रोजी मांजरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले यांचा अर्जदार नं. १ हा मुलगा, अर्जदार नं. २ हि विधवा पत्नी, अर्जदार नं. ३ हि सुन आणि अर्जदार नं. ४ ते ६ हे नाती व नातु आहेत. मयत गणेश उर्फ गणपत कुंडलिक उदमल्ले यांचा अर्जदार नं. १ हा भाऊ, अर्जदार नं. २ हि आई, अर्जदार नं. ३ हि विधवा पत्नी, अर्जदार नं. ४ ते ६ हे मुली व मुलगा आहे. मयत कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले आणि मयत गणेश उर्फ गणपत कुंडलिक उदमल्ले यांना अर्जदार नं. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत कुंडलिक लक्ष्मण उदमल्ले आणि मयत गणेश उर्फ गणपत कुंडलिक उदमल्ले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक/०४/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.२२०/२०२५

अर्जदारः-१- लखीचंद पिरण ठाकरे, वय ६१ वर्ष, धंदा शेती, रा. सायगव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद, २) राहुल लखीचंद ठाकरे, (पाटील) वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद, ३) गुणवान लखीचंद ठाकरे, वय- ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. सायगव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद, ४) सरिता योगेश शेलार, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. जिगाव पो.सायने, ता. मालेगाव, जि. नाशिक

-विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज :-वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस.एन. उपासणी यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे. अर्जदार क्र. १ यांची पत्नी व अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या आई नामे कमल लखीचंद ठाकरे या होत्या त्या दिनांक २६/०५/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे सायगव्हाण ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहे, अर्जदार क्र. १ ते ४ हे त्यांचे वारस आहे, सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाटी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक ०८/०४/२०२५

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# राणाचे प्रत्यार्पण, मोदी सरकारचे मोठे यश

मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणण्यात मोदी सरकारला यश मिळाले आहे. राणाच्या प्रत्यार्पणामुळे मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या तसेच जखमी झालेल्यांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. हल्ल्यातील बळींच्या नातलगांनाही दिलासा मिळाला आहे. जे आतापर्यंत काँग्रेसच्या सरकारला साध्य करता आले नाही, ते मोदी सरकारने करून दाखवले. 'मोदी है तो मुमकीन है' असे म्हटले जाते, त्याची पुन्हा एकदा प्रचीती आली आहे.

भारताच्या मुत्सद्देगिरीला मिळालेले हे मोठे यश म्हटले पाहिजे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मैत्री असल्याचे म्हटले जाते. मोदी यांच्यासोबतच्या मैत्रीला ट्रम्प जागले, मित्र कसा असावा हे त्यांनी दाखवून दिले, असे म्हणायला हरकत नाही. टेरिफ प्रकरणावरून डोनाल्ड ट्रम्प सध्या वादग्रस्त ठरले आहेत, जगाच्या दृष्टीने खलनायक (व्हीलन) झाले आहेत. ट्रम्प यांच्या टेरिफचा फटका भारतालाही बसत आहे. गेल्या काही वर्षांपासून शिक्षण, रोजगार तसेच व्यापारासाठी अमेरिकेत गेलेल्या भारतीयांची झोपही ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे उडाली आहे. मात्र राणाला भारतात पाठवून ट्रम्प यांनी समस्त भारतीयांची मने जिंकली, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. ट्रम्प यांची ही कृती शेवटच्या चेंडूवर सिक्सर मारून सामना जिंकून देण्यासारखी आहे.

मोदी यावर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेला गेले असताना त्यांनी तहव्वूर राणाला भारताच्या स्वाधीन करण्याची आग्रही मागणी ट्रम्प यांच्यासमोर केली होती. ही मागणी ट्रम्प यांनी लगेच मान्यही केली होती. त्यानुसार राणाच्या प्रत्यार्पणाची घोषणाही करण्यात आली होती. ही घोषणा करताना ट्रम्प यांनी जे विधान केले, ते महत्त्वपूर्ण होते. भारताला न्याय मिळवून देण्यासाठी एका हिंसक माणसाला आम्ही तत्काळ पाठवत आहे, असे ट्रम्प यांनी संयुक्त पत्रपरिषदेत म्हटले होते. त्याची पूर्तता दोन महिन्यांच्या आतच झाली आहे. हे मोदी सरकारचे मोठे यश म्हटले पाहिजे. मात्र हे काही एका दिवसात वा काही दिवसांत झाले नाही. त्यासाठी भारताला मोठा आणि सातत्यपूर्ण असा पाठपुरावा करावा लागला. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याबाबत २०११ मध्ये राणा याच्यावर एनआयएने आरोपपत्र दाखल केले होते. त्यानंतर २०१९ मध्ये त्याच्या प्रत्यार्पणाची औपचारिक मागणी करण्यात आली होती. २०२० मध्ये राणाच्या तात्पुरत्या अटकेची मागणीही करण्यात आली होती. फेब्रुवारी २०२१ मध्ये भारताने पुन्हा राणाच्या प्रत्यार्पणाबाबत अधिकृत पत्र पाठवले होते. भारताने नुसते पत्रच पाठवलेच नाही तर राणाच्या दहशतवादी हल्ल्यातील सहभागाबाबतचे पुरावेही सादर केले होते. या पुराव्यांच्या आधारेच अमेरिकेच्या संघीय न्यायालयाला त्याच्या प्रत्यार्पणाचा आदेश द्यावा लागला. रॉ आणि एनआयए यांनी राणाला मुसक्या बांधत भारतात आणले. त्याला विशेष विमानाने आणावे लागल्यामुळे फरफटत आणले, असे शब्दशः म्हणता येणार नसले तरी भावार्थ त्यापेक्षा वेगळा नाही. एनआयएच्या न्यायालयात आता राणावर खटला चालवला जाणार आहे.

मोदी आणि ट्रम्प यांच्या मैत्रीमागे दोघांची एकच विचारधारा हे प्रमुख कारण असावे, असे दिसते. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मोदी यांनी 'नेशन फर्स्ट'चा नारा दिला होता. त्याआधी गुजरातचे मुख्यमंत्री असताना मोदी 'गुजरात फर्स्ट'चे पुरस्कर्ते होते. यावेळी दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनीही 'अमेरिका फर्स्ट'ची घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी घेतलेले काही निर्णय जगाच्या दृष्टीने वादग्रस्त ठरत असले तरी ते अमेरिका आणि अमेरिकी नागरिकांच्या हिताचे असल्याचे मानले जात आहे.

तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणामुळे पाकिस्तान अस्वस्थ झाला आहे. कारण मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याची आतापर्यंत चर्चा होती, तसे आरोपही केले जात होते. मात्र मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचे राणाच्या न्यायालयातील साक्षीवरून सिद्ध आणि स्पष्ट होणार आहे. त्यामुळे राणाचा आणि आपला काही संबंध नसल्याचे सिद्ध करण्याची पाकिस्तानची केविलवाणी धडपड सुरू झाली आहे. त्यामुळेच राणा हा पाकिस्तानचा नागरिक नाही तर कॅनडाचा नागरिक असल्याचा दावा पाकिस्तान करीत आहे. राणाने पाकिस्तानच्या आपल्या नागरिकत्वाबाबतच्या कागदपत्राचे दोन दशकात नूतनीकरण केले नसल्याचा दावाही पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्रालय करीत आहे. राणाने आपल्या नागरिकत्वाचे नूतनीकरण केले नसल्याचा दावा पाकिस्तान करीत आहे, याचाच अर्थ त्याच्या आधी तो पाकिस्तानचा नागरिक होता, याची एकप्रकारची कबुलीच पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. राणा पाकिस्तानी लष्करात डॉक्टर होता, तो जर पाकिस्तानचा नागरिक नव्हता तर त्याची पाकिस्तानच्या लष्करात नियुक्ती कशी झाली, परदेशी नागरिकांचीही आपल्या लष्करात पाकिस्तान नियुक्ती करते का, असे प्रश्न यातून उपस्थित होऊ शकतात.

राणावर मुंबई बॉम्बहल्ल्यातील मुख्य सूत्रधार डेव्हिड कोलमन हेडली याला मदत केल्याचा आरोप आहे. नुसता आरोपच नाही तर त्याचे ठोस पुरावेही आहे. मुंबईत कुठे कुठे दहशतवादी हल्ले करायची याची रेकी राणानेच केली होती. या हल्ल्यातील अजमल कसाबला फाशीची शिक्षा झाली आहे. मात्र कसाब हा एकटा नव्हता, तर त्याच्यामागे हेडली, राणा यासारखे पडद्यासमोरून तसेच पडद्यामागून काम करणारे शेकडो लोक होते. विशेष म्हणजे पाकिस्तानी राज्यकर्ते, पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयचा या सर्वांवर वरदहस्त होता. त्यामुळे राणाच्या न्यायालयातील साक्षीपुराव्यावरून आपला खरा चेहरा समोर येईल, अशी भीती पाकिस्तानला भेडसावत आहे. राणा एनआयएच्या न्यायालयात पाकिस्तानचा पर्दाफाश करेल, यात संशय नाही.

राणाच्या प्रत्यार्पणाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न आता काँग्रेसने सुरू केला आहे. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्यात काँग्रेसचा हात कोणी धरू शकत नाही. राणाच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया मोदी सरकारने सुरू केली नाही तर काँग्रेसच्या शासनकाळात सुरू झाली असल्याचा दावा माजी गृहमंत्री पी. चिदंबरम् यांनी केला. राणाच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया काँग्रेस शासनाने सुरू केली यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवू शकणार नाही.

मुंबईवरील दहशतवादी हल्ला हा २००८ मध्ये झाला होता. त्यानंतर जवळपास सहा वर्षे देशात काँग्रेसचे सरकार होते. या सहा वर्षांच्या काळात काँग्रेसने तहव्वूर राणा याला अमेरिकेच्या ताब्यातून हिसकावत भारतात का आणले नाही, याचे उत्तर चिदंबरम् यांनी दिले पाहिजे. गृहमंत्री म्हणून या काळात त्यांनी कोणते दिवे लावले, तेही त्यांनी सांगितले पाहिजे.

शिवसेना उबाठाचे नुसते वाचाळ नाही तर अतिवाचाळ प्रवक्ते संजय राऊत नेहमीच उचलली जीभ लावली टाळूला असेच बोलत असतात. सरकारने तहव्वूर राणाला भारतात आणले, दाऊद इब्राहिमला का आणले नाही, असा हास्यापद आरोपवजा विधान केले. राऊत लहानपणी डोक्याच्या भारावर पडले होते की काय, अशी शंका येते. तुम्ही आरोप करायलाही हरकत नाही, मात्र तुमचा आरोप हा तर्कसंगत असायला हवा. कोणत्याही विचारी माणसाचा त्यावर विश्वास बसला पाहिजे. आपण काय बोलतो, हे संजय राऊत यांनाही समजते का अशी शंका येते. राणाला भारतात आणण्याचे प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होते. त्यामुळे त्या प्रयत्नाला यश येण्याआधीच आम्ही राणाला आणणार असे म्हणायचे नसते, कारण त्यातून तुमच्या प्रामाणिक प्रयत्नांना धक्का बसत असतो. तुमचा अतिउत्साहीपणाही त्यातून दिसत असतो. दाऊद इब्राहिमला भारतात आणण्याचे प्रयत्न सुरूच नसतील, असे नाही. मात्र त्या प्रयत्नाला यश आल्यानंतरच त्याबाबतचा दावा करायचा असतो. राणा भारतात आला, उद्या दाऊद इब्राहिम भारतात आला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण देशात सध्या नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. मोदी सरकार जे म्हणते ते नक्कीच करत असते आणि जे म्हणत नाही, बोलत नाही, ते तर शंभर टक्के करून दाखवत असते.

---

## यंगिस्तान

# कोकणची माणसं साधी भोळी, पण मूर्ख नाहीत!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

उबाठाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी कोकण पादाक्रांत करण्याची घोषणा केली आहे. काही पत्रकारांनी यास एल्गार असे म्हटले. खरं पाहता उद्धव ठाकरे यांचा राजकीय प्रवास काहीसा निराशाजनक आहे. वारसाहक्कात मिळालेलं टिकवता न आलेल्या राजपुत्राची ही कथा आहे. तो राजपुत्र स्वतः राजा झाला आणि त्याने सर्वस्व गमावलं. अनेक सेनापती, लढवय्ये त्याला सोडून गेले. केवळ खोटी स्तुतिसुमने उधळणारी भाट मंडळी जवळ राहिली. ही भाट मंडळी स्वतःच्या फायद्यासाठी राजाच्या जवळ आहेत. त्यात राजा झालेल्या त्या राजकुमाराच्या राजकुमारामुळे राज्य आणखी डळमळीत झाले. अशीच कथा उद्धव ठाकरे यांची आहे. लोकसभेत थोडेसे यश लाभल्याने जणू जग पादाक्रांत केल्याचा आनंद ठाकरेंनी व्यक्त केला होता. मात्र विधानसभेत त्यांची नालस्ती व्हावी इतक्या कमी जागा आल्या. एकनाथ शिंदे हेच बाळासाहेब ठाकरे यांचे खरे वारस आहेत, हे जनतेने दाखवून दिलं आहे.

आता काही महिन्यांत महापालिकेची निवडणूक लागेल. या निवडणुकीत मुंबई-ठाणेवर उबाठाचं लक्ष असणार आहे. या निवडणुकीत सर्वांनाच कळून चुकणार आहे की मुंबई व ठाण्यात उबाठाची काय परिस्थिती असणार आहे. उबाठाने मराठी व हिंदू असे पारंपरिक मतदार गमावले आहेत. लोकसभा आणि विधानसभेत मुस्लिम मतांनी त्यांची होडी समुद्रकिनारी पोहोचवली, नाहीतर समुद्रातच विसर्जन झालं असतं. आणि म्हणूनच वक्फ बिल सुधारणा विधेयकाला उबाठा गटाने विरोध करून मुस्लिमांचं पांग फेडलं. आपण हिंदूंच्या नव्हे तर मुस्लिमांच्या लांगूलचालनाच्या बाजूने आहोत हे उबाठाने पुन्हा एकदा दाखवून दिलं. बरं, तसं पाहता वक्फ बिलामुळे मुस्लिम समाजाचा काहीही फायदा होत नव्हता. मुळात मुस्लिम समाजाचं काँग्रेस संस्कृतीने कधी भलं केलेलं नव्हतं. त्यांच्यातील काही कट्टरतावाद्यांना खुश करणे यालाच मुस्लिमांचं भलं करणं म्हणतात - अशी पद्धत आपल्याकडे पाडली गेली आहे. आणि हेच उबाठाने केलं. त्यामुळे वक्फ बिलाला विरोध करून आणि वक्फला पाठिंबा देऊन मुंबईत अकस्मात वाढलेल्या मुस्लिम लोकसंख्येचा फायदा उचलण्याचा विचार उबाठाने केलेला आहे. कदाचित कोकणातही त्यांचा हाच डाव असू शकतो. एकीकडे ठाकरेंनी कोकण पादाक्रांत करण्याची घोषणा केली असताना दुसरीकडे कोकणातील त्यांचे उरलेले शिलेदार त्यांना अलविदा म्हणत बाहेर पडत आहेत. रायगडमध्ये स्नेहल जगताप ठाकरेंना सोडून अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात गेल्या. तर आता रोह्यातील समीर शेडगेंनी देखील ठाकरेंची साथ सोडली आहे. अशातच ठाकरेंचे जुने सहकारी जे आता शिंदेंच्या शिवसेनेत आहेत, त्या दीपक केसरकर यांनी कोकणच्या बाबतीत उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप केले आहेत.



केसरकर म्हणाले, "कोकणातील शेतकऱ्यांसाठी काजू बोर्डाबाबत महाविकास आघाडी सरकारने एक समिती स्थापन केली होती. त्यावेळी, मी अर्थ राज्यमंत्री असण्यासोबतच त्या समितीचा अध्यक्षही होतो. ते काजू धोरण कोकणात परिवर्तन घडवून आणणारे एक महत्त्वाचे धोरण होते, परंतु मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कधीही या धोरणाला मान्यता दिली नाही. त्यावेळी ठाकरे यांनी कोकणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. कोकणावर त्यांचे किती प्रेम आहे हे मी अगदी जवळून अनुभवले आहे. कोकणी लोकांवरील त्यांचे प्रेम कृत्रिम आहे." तसेच केसरकर पुढे म्हणाले की, "एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी कोकण काजू मंडळाच्या विकासासाठी १,५०० कोटी रुपये मंजूर केले होते. शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात काजू शेतकऱ्यांना पहिल्यांदाच आर्थिक मदत मिळाली. काजू उत्पादक सर्व शेतकऱ्यांना ३,००० रुपये देण्यात आले."

दीपक केसरकरांनी हे महत्त्वाचे विधान करून उद्धव ठाकरे यांची पोलखोल केली आहे. कोकणचं सोडा, मुंबईकरांनी कोरोनाकाळात अनुभवलेले मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे सर्वांत कमकुवत मुख्यमंत्री होते. ते घरातून बाहेरच पडायचे नाहीत. केवळ सही करण्यासाठी क्वचित बाहेर पडणारे सह्याजीराव म्हणून ते वावरत होते. त्यामुळे नशिबाने त्यांना मुख्यमंत्री होण्याची संधी दिली होती आणि त्यांनी ती स्वतःच्याच हाताने घालवून टाकली. महाराष्ट्राच्या इतिहासातील 'व्हर्स्ट सीएम' म्हणून त्यांची इतिहासात नोंद झाली आहे. म्हणूनच दर महिन्याला पेड प्रमोशन करून ते स्वतःला 'बेस्ट सीएम'ची पदवी देत राहिले. उद्धव ठाकरे यांचे राजकारण भाट मंडळींवर चालते. ते काम काही करणार नाही, परंतु त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळत राहिले पाहिजे. हे काम संजय राऊत व्यवस्थित करतात. म्हणूनच राऊत हे ठाकरेंचे खास आहेत. त्यांना मुख्य प्रवक्तेपद मिळाले आहे. अशी खोटी स्तुतिसुमने उधळणाऱ्या भाट मंडळींच्या आधारावर ते कोकण कसा पादक्रांत करणार? कोकण हा शांत व संयमी परिसर आहे. इतर विभागांपेक्षा कोकणची जडणघडण वेगळी आहे. इथला माणूस भोळाभाबडा मानला जातो. म्हणूनच गाण्यातही "कोकणची माणसं साधी भोळी" असा उल्लेख कवीला करावा लागतो.

कोकणातली चाकरमनी मंडळी फार पूर्वीपासून मुंबईत येऊन राहिलेली आहेत. कोकणी माणसाने ठाकरेंचे राजकारण अगदी जवळून पाहिले आहे. उद्धव ठाकरेंचे राजकारणही त्याने अनुभवले आहे. म्हणूनच कोकणावर आधिपत्य असणाऱ्या उबाठाला कोकणवासीयांनी मते दिली नाहीत. वक्फ बिलाला विरोध करून उबाठा ज्यांच्या खांद्यावर पाय ठेवून कोकण पादाक्रांत करण्याचे स्वप्न पाहत आहेत, ते त्यांची किती साथ देतील.

प्रबोधनकार ठाकरे म्हणाले होते, "एखाद्याला आपटायचं असेल तर त्याला आधी उचलावं लागतं." म्हणूनच कोकणी माणसाच्या साध्या भोळ्या स्वभावाचा फायदा उचलण्याचा कुणी प्रयत्न केला तर कोकणी माणूस किती भोळा असला तरी तो धडा शिकवतोच. कोकणची माणसं साधी भोळी पण मूर्ख नाहीत!

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# अवकाळी पाऊस आणि कारणे

मोसमी वारे भारतातून बाहेर पडल्यानंतर येणारा कुठलाही पाऊस अवकाळी म्हणून गणला जातो. भारतात साधारणतः २० टक्के इतके प्रमाण अवकाळी पावसाचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राला दरवर्षी उन्हाळ्यात अवकाळी पावसाचा सामना करावा लागत आहे. पूर्वी मार्च महिन्यात अवकाळी पाऊस यायचा. आता एप्रिलमध्ये येऊ लागला आहे. कधी कधी रणरणत्या मे महिन्यातसुद्धा पाऊस पडतो! बुधवार ९ एप्रिल रोजी ध्यानीमनी नसताना सायंकाळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली. एकतर अवकाळी पाऊस वादळी असतो आणि सोबत गारासुद्धा कोसळत असल्याने शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागते. अवकाळी पावसादरम्यान गारा का कोसळतात? असा प्रश्न पडतो. खरे तर कुठलाही पाऊस गारांच्या रूपानेच ढगांमधून सुटतो. पृथ्वीच्या खालच्या थराजवळ गारा आल्यानंतर उष्ण वातावरणामुळे त्यांचे रूपांतर थेंबांमध्ये होते आणि पाऊस कोसळतो. मोसमी पावसादरम्यान गारा पडण्याची शक्यता नसते. कारण, मोसमी पावसाचे ढग अडीच किलोमीटर उंचीपर्यंत असतात त्यामुळे बाष्पाचे रूपांतरण छोट्या गारांमध्ये होताच गुरुत्वाकर्षणामुळे त्या पृथ्वीच्या दिशेने झेपावतात. परिणामी, पावसाळ्यात गारा पडत नाही. परंतु, अवकाळी पावसाचे ढग ६ किंवा त्यापेक्षाही अधिक किलोमीटर उंचीवर असतात. या ठिकाणी उणे तापमानामुळे बाष्प सूक्ष्म कणाच्या आधारे आपले अस्तित्व निर्माण करतात आणि नंतर वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर ढगांमध्ये या गारा फिरत राहतात. त्यामुळे एकावर एक थर गोठतात आणि वजन वाढले की वाऱ्याचा प्रवाह भेदून पृथ्वीच्या दिशेने येतात. आकारमान अधिक असल्याने या गारा पूर्णतः विरघळत नाही आणि मग गारांचा पाऊस पडतो. समुद्रावरून येणारे बाष्प आणि उत्तरेकडून येणारी थंड हवा एकमेकांवर आदळल्याने ९ एप्रिल रोजीचा पाऊस पडल्याचे तज्ज्ञ सांगतात. अवकाळी पावसामागे वातावरणातील बदल प्रामुख्याने कारणीभूत आहे. अलिकडे ऋतुधर्म कायम असला तरी ऋतुचक्र बदलल्याचे स्पष्ट जाणवत आहे. उन्हाळा जून महिन्यातही तापतो. तर पावसाळा ऑक्टोबरपर्यंत लांबतो. कुठे खूप पाऊस पडतो तर कुठे अवर्षण जाणवते! यामागे वातावरणातील मानवी हस्तक्षेप प्रामुख्याने कारणीभूत आहे. सध्या विदर्भात भुईमूग, सोयाबीन, संत्रा, केळी, तिळ आदी उन्हाळी पिके आहेत. परंतु, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

मागील काही वर्षांपासून वातावरणातील तापमान, हवेचा दाब आणि आर्द्रतेत मोठा बदल घडून आल्याने महाराष्ट्राला अवकाळी पावसाचा सामना करावा लागत आहे. याच कारणामुळे २०१० ते २०२१ पर्यंत पावसाळ्यात खूप कमी पाऊस पडला. मात्र, २०२३ पासून गरजेपेक्षा अधिक पाऊस पडत आहे. अवर्षणाची १० वर्षे नदी-नाल्यांना पूर पाहिला नव्हता. परंतु, आता नदी-नाल्यांना महापूर येऊन प्रचंड प्रमाणात वित्त आणि जीवहानी होत आहे. मानवाने आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात जंगलतोड केल्याने वातावरणावर प्रचंड परिणाम झाला आहे. अवकाळी पाऊस पिके निघाल्यानंतर आला तर फारसा फरक पडत नाही. परंतु, हिवाळ्यात आल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. अवकाळी पावसासोबत वादळाचा वेगही अधिक असतो. त्यामुळे पपई व केळीच्या बागांना प्रचंड फटका बसतो. सोबत गाराही कोसळत असल्याने भाजीपालावर्गीय पिके मातीमोल होतात. तसेच विजा पडण्याचे प्रमाण अधिक असल्याने हजारो जनावरे व नागरिकांचा मृत्यू होतो. अवकाळी पाऊस निघून गेल्यानंतर उष्मा वाढल्याने पशू-पक्ष्यांसह नागरिकांनाही विविध आजारांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अवकाळी पाऊस सर्वांनाच नकोसा असतो. मात्र, अलिकडे अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले आहे. उच्च तापमान आणि आर्द्रतेमुळे प्रचंड प्रमाणात बाष्पीभवन होऊन मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस कोसळतो. हवामानातील बदल आणि विविध प्रकारच्या वादळांमुळे या पावसाची तीव्रता वाढत आहे. भारताच्या एका बाजूला अरबी समुद्र आणि दुसरीकडे बंगालचा उपसागर आहे. या समुद्रांमध्ये मागील काही वर्षांपासून मोसमी पावसानंतर सातत्याने कमी दाबाचे पट्टे आणि वादळांची निर्मिती होत असल्याने महाराष्ट्राला अवकाळी पावसाचा तडाखा बसत आहे. उष्ण वारे आणि थंड वारे एकमेकांवर आदळल्यानंतर हवा वर जाते आणि ढगांची निर्मिती करते. त्यानंतर गारांसह वादळी पाऊस पडतो. तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे अवकाळी पावसाचे प्रमाण वाढून शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती तज्ज्ञांकडून वारंवार वर्तविली जाते. शेतकऱ्यांनी हवामान तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढील दिशा ठरविल्यास काही प्रमाणात का होईना नुकसान टाळणे शक्य होईल.

९८८१७१६०२७

---

## मुंबई वार्तापत्र


# रडत राऊत?

**नागेश दाचेवार**

मुंबईवर झालेल्या हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणा याचे अमेरिकेकडून भारताला प्रत्यार्पण करण्यात आले. त्याचा "तहव्वूर राणा फेस्टिव्हल" काय साजरा करत आहात. याआधीही प्रत्यार्पण झाले आहेत. मुळात काँग्रेसच्या काळातच राणाच्या प्रत्यार्पणाची कार्यवाही सुरू झाली होती. राणाला आणण्यासाठी २००९ पासून भारत सरकार प्रयत्न करत आहेत. कुणालाही भारतात आणण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाते. हे आपल्या भारत सरकारचं यश आहे. त्यात कोणत्याही पक्षाचा संबंध नाही. यात आजच्या सरकारचे कुठलेही श्रेय नाही. भारताचे कुलभूषण जाधव अजूनही पाकिस्तानच्या ताब्यात आहेत, त्यांना भारतात परत आणण्यासाठी केंद्र सरकार काय करत आहे?, त्यांना भारतात आणून दाखवा. असं आव्हान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देत, पश्चिम बंगाल, बिहारच्या निवडणुकांसमोर राणाला फाशी दिली जाईल. अशा एक नव्हे तर, अनेक प्रकारे रडफडही रडत राऊतांची यावेळी सुरू आहे.

एकीकडे मुंबईच्या मारेकऱ्याच्या मुसक्या आवळून भारतात आणल्यामुळे मुंबईसह देशात अभिमान जागवणारं स्फुरण चढलेले असताना, राऊत एकमेव का रडत बसले आहेत हे कळण्यापलीकडे आहे. शिवाय तहव्वूर राणाच्या चौकशीत कुणाचं पितळं उघडं पडेल म्हणून राऊतांना वाईट वाटायला लागलं की काय? आपल्या सरकारने देशद्रोह्याच्या मुसक्या आवळल्या याचा आनंद होण्याऐवजी राणाच्या प्रत्यार्पणाची टिंगल उडविण्याचा प्रकार राऊतांनी चालविला आहे. तहव्वूर राणाला पकडलं जाणं, यशस्वीपणे भारतात आणणं, त्याची चौकशी करणं आणि दहशतवादी हल्ल्याचं कारस्थान उघड होणं, पाकिस्तानचा हात स्पष्ट होणं, कोणाच्या इशाऱ्यावर हल्ला झाला त्याचं नाव उघड होणं आणि भारतातले त्यांचे एजंट्स उघडकीस येणं, जगात वेगवेगळ्या व्यासपीठांवर पाकिस्तानला उघडं पाडणं, अशी सगळी शक्यता निर्माण झाली आहे. याचा आनंद होण्याऐवजी संजय राऊतांच्या पोटात का दुखायला लागलं आहे?

ज्या काँग्रेसच्या काळात ही प्रक्रिया सुरू झाली असे राऊत म्हणत आहेत. त्याच काँग्रेसचे नेते पी. चिदंबरम् यांनी देखील, राणाला भारतात आणल्याचे एकप्रकारे स्वागतच केले. हा केवळ श्रेय हे त्यांचे नाही आमचे असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. आता तेवढा राजकीय स्वार्थ जर साधला नाही तर मग राजकारणी कसले. त्याचसोबत राज्यातले काँग्रेसचे नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी तर, कसाबप्रमाणे पूर्ण संधी देऊन राणाला फाशीची शिक्षा दिली जावी अशी साधी अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी कुठलीही टीका टिप्पणी केली नाही. मात्र, त्याचवेळी राऊत आणि त्यांच्या पक्षाचा कुठलाही संबंध नसताना राऊत उगाचच या प्रकरणात उडताना दिसत आहेत.



मुळात बोलघेवड्या रडत राऊतला कुठल्याही गोष्टींची माहिती, अभ्यास नसतो. केवळ वाट्टेल ते बरळतो. एखाद्याला लायकीपेक्षा जास्त मिळालं की असा प्रकार घडत असतो. खटल्याला गती देणं, पाठपुरावा करणं आणि प्रत्यक्ष कृतीत आणणं हे सगळं करणं सकाळी पत्रकारांसमोर बोलण्याएवढं सोपं नाही. राऊत नावाच्या या भाटाच्या माहितीत भर घालण्यासाठी सांगू इच्छितो की, २००९ पासून काँग्रेसने राणाच्या प्रत्यार्पणासाठी कार्यवाही सुरू केली. राणा मुंबई दहशतवादी हल्ल्याचा आरोपी असल्याचे काँग्रेस सरकारने अमेरिकेला सांगितले आणि त्याला आमच्या स्वाधीन करा असे सांगितिले. मात्र, अमेरिकेने केवळ दीड वर्षात काँग्रेस सरकारच्या मागणीला कचऱ्याच्या टोपलीत टाकत, २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात राणाला निर्दोष घोषित केले होते. त्यानंतर २०१४ पर्यंत काँग्रेसचं सरकार होतं. पण त्या सरकारनं विरोध तर सोडा साधा निषेध केला नाही. तेव्हाचे गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून अमेरिकेच्या या निर्णयाचा विरोध केला होता. बाकी एकाही काँग्रेसी नेत्याची आणि आता गळे काढत असलेल्यांपैकी कुणाचीही ब्र देखील उच्चारण्याची हिंमत झाली नव्हती.

राणाला अमेरिकेने ताब्यात दिले नाही, म्हणण्याएवढं सोपं नाही. एवढं सोपं असतं तर, त्यासाठी १६ वर्षे लागली नसती. २०१४ मध्ये जेव्हा नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले. त्यानंतर मोदींच्या विशेष प्रयत्नाने आणि कुटनीतीने अखेर अमेरिकेने राणा हा निर्दोष भारतीयांच्या हत्येस कारणीभूत असल्याचे मान्य केले. पण त्याही नंतर अमेरिकेने राणाला आपल्या ताब्यात दिले नाही. त्यासाठी २०२५ उगवावं लागलं. मोदी सरकारची विदेश नीती, कायदेशीर प्रक्रिया राबविण्याचे कसब, अमेरिकासारख्या बलाढ्य देशाला नमविण्याची मनगटात असलेली धमक याचीच फलश्रुती म्हणून आज तहव्वूर राणा भारतात आला आहे, हे मान्य करायलाच पाहिजे. रडत राऊतांसारख्या दोनचार विघ्नसंतोषी लोकांच्या रडण्याने सत्य लपणार नाही. कोंबडा झाकल्याने सूर्य उगवणार नाही असे कुणाला वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. एकीकडे राणा उत्सव म्हणवू नका हे कुण्या पक्षाचे, मोदी सरकारचे यश नाही. त्याच वेळी कुलभूषण जाधव परत न आल्याचे अपयश मात्र, यंत्रणांचे नव्हे तर, ते मोदी सरकारचे असते. पुलवामा हल्ल्याचे अपयश यंत्रणांचे नव्हे, ते मोदी सरकारचे असते. एअर स्ट्राईक केली, सर्जिकल स्ट्राईक केली, तेथील सैन्य, पोलिस आणि पाकिस्तान सरकार स्वतः हल्ला झाल्याचे मान्य करते. त्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उभं करणं देखील या नतद्रष्टांचं कुकृत्य आहे. यावेळी सरकार सोडा पण सैन्यावर अविश्वास दाखविण्याचे पाप यांनी केलं आहे. केवळ मोदी आणि भाजपा विरोधापोटी देशाचा विरोध करायला लागलेल्या या रडत राऊतांसारख्या लोकांच्या बुद्धीची कीव येते.

### मराठी माणसांची घरं कधी देणार?

कुलभूषण जाधवांना कधी भारतात आणणार असा प्रश्न विचारणाऱ्या राऊतांनी आधी पत्राचाळ घोटाळ्यात बेघर झालेल्या ६७२ मराठी कुटुंबांना घरं कधी देणार? या प्रश्नाचं उत्तर राऊतांनी दिले पाहिजे. ज्या मराठी आणि मुंबईच्या अस्मितेचा मुद्दा उपस्थित करून आपली राजकीय पोळी शेकता, त्या मराठी माणसांच्या हक्काची घरं अजूनपर्यंत का दिली नाही, याचं उत्तर आधी राऊतांनी दिलं पाहिजे. या घाटोळ्यातील आरोपीकडून लक्षावधी रुपये कशासाठी घेतले होते, याचं उत्तर आधी त्या मराठी कुटुंबांना दिले पाहिजे. ईडीची कारवाई झाल्यावर ते ताबडतोब परत का केले याचे उत्तर या महाराष्ट्राला दिले पाहिजे. एका सामान्य मराठी शिक्षिका असलेल्या तुमच्या बायकोला कोट्यवधी रुपयांची गरज का भासली आणि ती भागविण्यासाठी एखाद्या बँकेकडून कर्ज घेण्याऐवजी भष्टाचारात लिप्त असलेल्या लोकांकडून पैसे तुमच्या बायकोने का घेतले, याचे स्पष्टीकरण राऊतांनी आधी दिले पाहिजे.

९२७०३३३८८६

---

### वडेट्टीवारांच्या बोलण्यातील द्वेष

विरोधी पक्षातील लोकांनी बोललेच पाहिजे असे बहुतेक संविधान सांगत असावे. तिकडे उद्धवरावांचा दवंडीकार तहव्वूर राणांवर बोललाच. पण चला ती केंद्र सरकारवरची टीका होती. पण इकडे ऑटोचालकाचा ऑटो स्पीकर झालेल्या वडेट्टीवारांना विदर्भातलं उन्ह लागलं का? भारतात अनेक हॉस्पिटल्समध्ये काही दुर्दैवी घटना घडत असतात. पश्चिम बंगालमधील हॉस्पिटलमध्ये एवढी मोठी घटना झाली तेव्हा संपूर्ण बंगाली लोकांना धारेवर धरलं नाही न कुणी! मग दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये न घडलेल्या दुर्दैवी घटनेला द्वेषपूर्ण शब्दात का एका भारतरत्न असलेल्या व एकूणच देशाच्या सांस्कृतिक ठेवा असलेल्या मंगेशकर कुटुंबीयांच्या नावाने हा माणूस खडे फोडतोय. वडेट्टीवार साहेब, मंगेशकर परिवाराचे हे हॉस्पिटल अनेक दशकांपासून सेवेत आहे. हजारो रुग्णांचे जीव त्यांनी वाचवले आहेत. तुमच्यासारखे 'बार' नाही उघडले. मंगेशकर कुटुंबीयांचा द्वेष करता करता ही मंडळी ब्राह्मण वर्गापर्यंत पोहोचली. काँग्रेस पक्षाच्या संस्कृतीत असेल हे. एखाद्या 'खाना'बद्दल बोलायला तर जीभ जड पडते यांची. विदर्भातील काँग्रेस वाचविण्याचे काम बहुधा या वडेट्टीवारांना दिलेलं दिसते. छान आहे, चालू द्या. तिकडे देशात राहुल गांधी आहे काँग्रेस बुडवायला तर इकडे आमचे विजयराव आहेत. मंगेशकर घराणे हे एक दैवी घराणे आहे. देशाची संपत्ती आहे. भारतरत्न लताजींचा आदर सर्व जगात आहे. केवळ नावाचे रुग्णालय आहे म्हणून एका दुर्दैवी घटनेला धरून या घराण्याच्या नावाने कोणी ओरड करत असेल तर बुद्धी वाटपाच्या वेळी तो कुठेतरी 'बसला' असेल.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### हा खेळ लूटमारीचा

निवडणुकीपूर्वी अनेक आश्वासने देऊन जनतेला भुलवून निवडणूक होतात. काही काळानंतर पक्षांचे खरे स्वरूप आणि खरे रंग झळकू लागतात. लाडकी बहीण योजना राबविताना पुढील कोणते निकष राबविले होते, असा प्रश्न जनतेच्या मनात येतो आहे. कारण गॅसच्या किमतीत ५० रुपये वाढ करून काय साध्य होत आहे? कोणालाही महागाईची झळ बसू नये अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्या गेल्या तरच सरकारवर विश्वास बसेल. खाजगी कंपन्यांच्या निवृत्त कामगारांना मात्र ८०० रुपये पेन्शनमध्ये दिवस काढावे लागत आहेत, हे वास्तव आहे. अनेकदा सरकारकडे मागणी करूनही कोणतीच अंमलबजावणी झालेली नाही. फक्त फेसबुकवर फेक बातम्यांचा वर्षाव होत असतो. याचाच अर्थ 'हा खेळ लूटमारीचा' हा चित्रपट बघून जनतेने समाधानी राहायचे का? आमदार, खासदारांच्या पगारात व पेन्शनमध्ये भरघोस वाढ होते आहे, याला जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा निर्लज्जपणा म्हणायचं का?

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

## वाचक पत्रे

### महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयात मराठीचा वापर

सध्या महाराष्ट्रात केंद्र शासनाच्या कार्यालयात मराठी भाषेचा वार याबद्दल आंदोलन सुरू आहे. वास्तविक 'राजभाषा अधिनियम, त्रिभाषा सूत्र' याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही त्या त्या कार्यालयातील प्रबंधनाची अर्थात तेथील कार्यरत कर्मचारी व अधिकाऱ्यांची असते. ती होत नाही याला विशेष करून मराठी भाषकच जबाबदार असल्याचे दिसून येते. नाहीतर अशी वेळच येते ना.

महाराष्ट्रातील कोणत्याही केंद्रीय कार्यालयात राजभाषा अधिनियमाप्रमाणे सूचना फलक आहेत की नाही हे जागरूक नागरिकांनी लक्षात आणून दिले पाहिजे. महाराष्ट्रातील विमानतळावरील सूचना फलक मराठीत आहेत का? तसेच तेथील उद्‌ घोषणा या मराठीत होतात काय? हे सुद्धा सर्वसामान्यांनी व लोकनियुक्त प्रतिनिधींनी लक्षात घ्यायला हवे. थोडक्यात कायद्याचे काटेकोर पालन झाले तर बऱ्याच गोष्टी सुलभ होतात.

**अ. ल. देशपांडे**/९२२५७०५८८४

●● ●●

### उष्णतेतही भक्तीचा गारवा

एप्रिल महिन्यातच देशभरात उष्णतेने उच्चांक गाठला आहे. या प्रखर उष्णतेत मिळणारी गारव्याची थोडीशी झुळूक देखील सुखावून जाते. सध्या देशभरातील अनेक मंदिरातून देवाच्या गाभाऱ्यात एसी, कूलरची व्यवस्था केलेली आहे. असे म्हणतात की देव हा भक्तीचा भुकेला आहे. मग ही भक्ती कुठल्याही स्वरूपात असो, ती त्या भक्ताला देवाच्या आणखी जवळ नेऊन पोहोचवते. अगदी दिवस-रात्र देवाला शीतलता देणारी ही यंत्रणा सुरू असते.

खरं तर ऊन, वारा, थंडी, पाऊस ही त्या देवाचीच रूपे आहेत. त्यामुळे या बदलाचा देवाला कुठलाही त्रास होत नाही. पण भक्ताच्या भावनेला प्रतिसाद देत देवसुद्धा ही व्यवस्था आनंदाने स्वीकारतो. प्राचीन काळापासून भारतभूमीस देवभूमी म्हणून ओळखले जाते. नासाच्या वैज्ञानिक भारतीय वंशाच्या सुनीता विलियम्स यांनी सुद्धा त्या ईश्वरावरील नितांत श्रद्धेपोटी आपली अंतराळ यात्रा सुखद व्हावी यासाठी श्री गणेशाची मूर्ती आपल्या सोबत नेली होती. भारतीय संस्काराची ही शिदोरी अंतराळातही श्रद्धेने जोपासली जाते. तात्पर्य हेच की त्याचं अस्तित्व आहे या श्रद्धेनेच आपण हे करतो.

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# प्रभाग, ग्रामसंघाला जागा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष अभियान राबवा

## संवाद मराठवाड्याशी उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त गावडे यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानापासून 'संवाद मराठवाड्याशी' या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आजपासून प्रारंभ केला. वेबिनारच्या माध्यमातून सुरु झालेल्या या उपक्रमातील पहिल्या-वहिल्या कार्यक्रमात त्यांनी मराठवाड्यातील महिलांशी संवाद साधला असता, अनेक महिलांच्या प्रमुख अडचणी समजून घेताना प्रभाग, ग्रामसंघाला जागा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष अभियान राबविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातून उपायुक्त (विकास) डॉ.अनंत गव्हाणे, सुरेश बेदमुथा आणि मराठवाड्यातून प्रकल्प संचालक, निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व उपस्थित होते. यापुढे दर बुधवारी एक विषय घेऊन मराठवाड्यातील जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या वेबिनारमधून अडचणी सोडविण्यास प्राधान्य देणार आहे. तसेच या उपक्रमामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) हे नोडल अधिकारी म्हणून काम करणार असल्याचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले. शुक्रवारपासून सुरु झालेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये मराठवाड्यातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संवाद मराठवाड्याशी' या वेबिनारमधून नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी सुरुवातीला या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान २०२५ अंतर्गत महिला बचत गटांशी संवाद साधताना यामध्ये संबंधितांनी चांगले काय काम केले, त्यांना काय लाभ मिळाला आणि जिल्हा प्रशासनाकडून काय मदत करता येईल, याबाबत त्यांनी महिलांकडून माहिती जाणून घेतली. तसेच विकास उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी बचत गटांना मिळणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमातून निधी, व्याज सवलतीबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी वसमत तालुक्यातील गिरगाव येथील नारी अनमोल महिला उत्पादक कंपनीने हळदीपासून पावडर तयार करण्याचे युनिट स्थापन केल्याचे सांगितले. या गावात २६४ प्रभाग गट असून, १३ ग्रामगट असल्याचे सांगून, हळद खरेदीसाठी कर्ज मंजूर झाले असून निधी तात्काळ मिळावा, अशी मागणी केली. तसेच नरसी नामदेव येथील श्री संत नामदेव महिला प्रभाग संघांनी बँक वैयक्तीक कर्ज देत नाहीत, त्यांना आपल्या स्तरावर निर्देश द्यावेत, अशी मागणी केली. तसेच हिंगोली येथील दयानंद ढोबळे यांनी कुणबी जातीचे जात वैधता प्रमाणपत्र मिळत नाही. ते देण्यासाठी आपल्यास्तरावर कार्यवाही करावी, अशी विनंती केली. यावर विभागीय आयुक्तांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत जात पडताळणी कार्यालयास कळविण्यात येईल, असे सांगितले. धाराशिव, नांदेड, परभणी, लातूर, बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महिलांनी प्रामुख्याने जागेची मागणी केली. त्यावर विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याचे त्यांना सांगितले.

यावेळी हिंगोलीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हाधिकारी कार्यालयातून निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, तहसीलदार अश्विन माने उपस्थित होते.

# चेहरा लपवीत खरेदी करणाऱ्या ग्राहकांची चौकशी करा- कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**

आपल्या दुकानातील चोरीचे प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असताना आपला चेहरा लपवित खरेदीचा बहाणा करणाऱ्या ग्राहकाची व्यापाऱ्यांनी चौकशी करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यापाऱ्यांच्या बैठकीत बोलताना दिल्या.

पुढे बोलताना कोकाटे म्हणाले की गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असली तरी जोपर्यंत आरोपीची ओळख पटली जात नाही तोपर्यंत त्याच्यावर कारवाई करता येत असल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्हीसारखे अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असल्याची माहिती गुन्हेगारांना सुद्धा झाली असल्याने तो सतत आपला चेहरा लपवित गुन्हेगारी कृत्य केल्यानंतर त्याचा शोध घेणे शक्य नसल्याने आपला चेहरा मास्क, हेल्मेट, रूमाल लावून लपवित खरेदी करण्याचा बहाणा करणाऱ्या ग्राहकाची व्यापाऱ्यांनी चौकशी करावी जेणेकरून त्यांचा चेहरा सीसीटीव्ही मध्ये कैद होईल. या संबंधी व्यापाऱ्यांच्या बैठकीत महत्त्वाच्या सूचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या. यावेळी शहरातील मुख्य बाजारपेठेत नेहमीच ट्राफिक जाम होत असल्याने ट्राफिक सिग्नल चालू करण्याची मागणी करण्यात आली यासोबत एमआयडीसी परिसरात पोलीस चौकी कार्यान्वित करीत शहरातील व्यापाऱ्यांना संध्याकाळी दहा ऐवजी अकरा वाजेपर्यंत आपली प्रतिष्ठाने सुरू ठेवण्यासाठी वेळ वाढवून देण्याचीही मागणी करण्यात आली विशेष करून गांधी चौकातील हात गाड्या मुळे व्यापाऱ्यांना तर पोलिसांच्या कारवाईमुळे हात गाड्या वाल्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी व वाढत्या शहरीकरणामुळे भाजी मार्केटला परंतु पर्यायी जागेची ही मागणी करण्यात आली. यावेळी मोकाट जनावरे, पार्किंगची पर्यायी व्यवस्था, इंदिरा गांधी चौकातील मी जजूर अड्डा, अग्रसेन चौक ते पाण्याच्या टाकीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत मोठी वाहने थांबतात. त्यामुळे रहदारीस अडथळा होत असल्यामुळे त्यांना पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली सदर बैठकीत व्यापाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. अंबादास भुसारे उपाधीक्षक कुंदन कुमार वाघमारे, पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, पोलीस निरीक्षक अनंत बनसोडे, संजय तोडेवाले, गजानन निर्मले यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी श्री हनुमान जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**



श्री हनुमान जयंती निमित्त मोठ्या उत्साहात नागरिकांनी सकाळी सहा वाजता श्री हनुमान मंदिरांमध्ये हनुमान जयंती साजरी केली. यावेळी अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील खटकाळी बायपास रोडवरील हिंगोलीचे ग्रामदैवत दक्षिणमुखी हनुमान मंदिरात सकाळी सहा वाजता श्री हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेकडो भाविकांच्या उपस्थितीमध्ये सकाळी सहा वाजता महाआरती करण्यात आली. यावेळी संपूर्ण मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. जागृत खटकाळी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी अनेक भाविकांनी प्रसादाचे वाटप केले. रविवारी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

येथील संकट मोचन हनुमान मंदिरातही श्री हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी सहा वाजता महाआरती तसेच विविध पदार्थांचा नैवेद्य हनुमानाला दाखवण्यात आला. यावेळी भजन, किर्तन करण्यात आले. दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. काही ठिकाणी शनिवारी तर काही ठिकाणी रविवारी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. महाप्रसादाचा लाभ धेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी जिल्हा काँग्रेस समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विधान परिषदेच्या सदस्या डॉ प्रज्ञा सातव, अॅड सचिन नाईक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सुरेशअप्पा सराफ, बापूराव बांगर, विलास गोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### प्रा. आशिष इंगळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार



हिंगोली- शैक्षणिक,सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वराज्य सरपंच सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मान कर्तत्वाचा सन्मान नेतृत्वाचा राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२५ या मानाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक भूषण पुरस्कार २०२५ ने शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक असलेले आशिष मारोतराव इंगळे यांना प्रदान करण्यात आला आहे. प्रा. इंगळे यांनी आतापर्यंत शिक्षण,समाजसेवा व पर्यावरण इत्यादी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा १३ एप्रिल रोजी माऊली संकुल सभागृह अहिल्यानगर येथे सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. या अगोदर प्रा. इंगळे यांना सामाजिक समता राज्यस्तरीय पुरस्कार, आयडियल स्टेट अवार्ड,मराठवाडा रत्न पुरस्कार,आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी आयकॉन पुरस्कार,राज्यस्तरीय पर्यावरण पुरस्कार,संत गाडगेबाबा राष्ट्रीय पुरस्कार, वसुमती राष्ट्रीय पुरस्कार, शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. त्याचबरोबर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक भूषण पुरस्कार जाहीर २०२५ झाल्याबद्दल प्रा.आशिष इंगळे यांचे हिंगोली जिल्ह्यासह संपूर्ण राज्यभरातून अभिनंदन केले जात आहे.

### क्रिडा गुणांसाठी १७ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

हिंगोली- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोलीच्या वतीने इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात. यासाठीचे ऑनलाईन प्रस्ताव १५ एप्रिल,२०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. परंतु, राज्य मंडळाच्या सचिवांच्या आदेशान्वये दि. १० एप्रिल ते १४ एप्रिल,२०२५ या कालावधीत आपले सरकार सेवा पोर्टल बंद राहणार असल्याने सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सबंधित विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी दि. २१ एप्रिल, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे कळविले आहे. अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडा शिक्षक व विद्यार्थी यांनी त्यानुषंगाने दि. १७ एप्रिल, २०२५ पर्यंत आपले सरकार या पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन प्रस्ताव भरुन घ्यावेत, त्यानंतर कोणत्याही प्रकारचे क्रीडा गुणांचे प्रस्ताव या कार्यालयामार्फत स्वीकारले जाणार नाहीत. खेळाडूं विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीस संस्था, शाळा सर्वस्वी जबाबदार राहतील, याची सबंधितानी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# गुंतवणुकदारांच्या संमेलनात नव उद्योजकांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**

उद्योग विभाग, उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत हिंगोली जिल्ह्यांतर्गत नवीन गुंतवणूकदारांचे संमेलन नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते हे होते. यावेळी नांदेड जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक कदम, हिंगोली जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण मोरे उपस्थित होते. यावेळी उद्योग सहसंचालक श्री. यशवंते यांनी या गुंतवणूक परिषदेमध्ये हिंगोली जिल्ह्यात २०५ उद्योजकांनी ७३८ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे, असे सांगून गुंतवणूक संमेलनाची सविस्तर माहिती दिली. मैत्री कक्षाचे नोडल अधिकारी सागर आवटे यांनी शासनाकडून उद्योजकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या परवान्याबाबत अंमलात आलेल्या नवीन कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच सीडबीच्या अधिकारी श्रीमती बलखंडे यांनी सीडबीच्या कामाविषयी सविस्तर माहिती दिली. मिटकॉन हिंगोलीचे प्रकल्प अधिकारी सुभाष जाधव, खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री. वाघमारे, अधीक्षक पी. व्ही मेंढे, उद्योग निरीक्षक सुदेशना सवराते, एल. एस. दिपके, सय्यद युनूस, दत्ता उचितकर, सुभाष बोरकर, विकास उंडाळ, किशन धाबे यांनी हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय निलावार यांनी केले.

# जल व्यवस्थापन कृती पंधरवाड्याचा १५ एप्रिलला शुभारंभ, विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**

पाणी व्यवस्थापनाची माहिती लोकांना व्हावी तसेच जलव्यवस्थापनाची मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी यादृष्टीने राज्यात जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे १५ ते ३० एप्रिल या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा प्रारंभ मंगळवार, (दि. १५) रोजी होणार आहे.

आज राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे जलव्यवस्थापन कृती पंधरवडा पूर्वतयारी आढावा घेतला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, अति. मुख्य सचिव दिपक कपूर यांची उपस्थिती होती. या बैठकीस राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, सर्व मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच या विषयाशी संबंधित मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकारी आदीची उपस्थिती होती.

यावेळी जल व्यवस्थापन पंधरवड्यात करण्यात येणाऱ्या कामकाजाचा पूर्व आढावा घेण्यात आला. या जल व्यवस्थापन पंधरवडा कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१५ एप्रिल रोजी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२५ साजरा करणे व जलसंपदा पंधरवडा प्रारंभ. १६ एप्रिल रोजी जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण व ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करणे, १७ एप्रिल रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, जल पुनर्भरण, १८ एप्रिल रोजी शेतकरी व पाणी वापर संस्था संवाद, १९ एप्रिल रोजी भूसंपादन व पुनर्वसन इ. अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, २० एप्रिल रोजी कालवा स्वच्छता अभियान, २१ एप्रिल रोजी उपसा सिंचनाचे पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारीचे निरसन करणे, २२ एप्रिल रोजी अनधिकृतपणे वाणिज्य व औद्योगिक पाणी उपसा प्रकरणे शोधून कार्यवाही करणे, २३ एप्रिल रोजी जलसंपदा व कृषी विभागामार्फत संयुक्तपणे पीक पध्दतीबाबत उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन इ. बाबत बैठक, कार्यशाळेचे आयोजन. २४ एप्रिल रोजी सिंचन-ई-प्रणाली, पाणी दर, पाणी पट्टी आकारणी व वसुली थकीत पाणीपट्टी प्रकरणांचा आढावा, २५ एप्रिल रोजी विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, सेवाभावी संस्था यांच्या समवेत संवाद व कृती कार्यक्रम, २६ एप्रिल रोजी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या प्रत्यक्ष पाणी वापराचा जललेखा परीक्षण व पाण्याचा पुर्नवापर न करता धरणांमध्ये व नदीमध्ये सांडपाणी येत असल्याबद्दल प्रकरणाचा शोध घेणे, २७ एप्रिल रोजी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, २८ एप्रिल रोजी महसूल विभागाच्या समन्वयाद्वारे महामंडळाच्या नावे संपादित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नोंदी घेणे, अतिक्रमण निष्कासन ३१ मे पूर्वी करणे, २९ एप्रिल रोजी पाणी वापर संस्था सक्षमीकरण, चर्चासत्र व कार्यशाळा, ३० एप्रिल रोजी पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा मुख्यालयी कार्यशाळा, महिला मेळावा, या पंधरवडा कालावधीत नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या अभियंत्याचे सत्कार व पंधरवडा समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

# हिंगोली, भांडेगाव येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ एप्रिल**





जिल्ह्यात ठिकठिकाणी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक जिल्हा परिषद कॉर्नर येथे सत्यशोधक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती अखिल भारतीय महात्मा ज्योतिबा फुले समता परिषद व माळी महासंघ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा आणि शहरातील सर्व फुले प्रेमींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा फुले यांच्या नियोजित पूर्ण कृती पुतळ्याच्या जागेवरती महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा जयजयकार करून जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी माजी नगर सेवक तथा समता परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष चंदू लव्हाळे, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार निरपसे, सुभाषराव कदम, शंकरराव देवकर, केशवराव जांबुतकर, गजानन वैद्य, लिंबाजी थोरे दिलीप धामणे, श्याम राऊत, राजेश गोरे, डॉ राजू धामणे, कैलास धामणे, अनिकेत लव्हाळे, अक्षय लव्हाळे, संतोष भुसांडे, सुधाकर मोकाडे, कैलास खरात, संग्राम पांडुळे, साहिल चौधरी, ऋषिकेश लव्हाळे, तुषार बनसोडे, नामदेव जाधव, रुपेश केतनवार, नितीन मोरे, कैलास शिंदे आदींची उपस्थिती होती.

सुखदेवानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भांडेगाव येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण संस्थेचे सरचिटणीस उत्तमरावजी जगताप हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सहसरचिटणीस ज्ञानदेवराव जगताप, संचालक प्रकाश निरगुडे, तसेच विद्यालयाचे प्राचार्य गजानन वैद्य सर पर्यवेक्षक दत्ता ढोबळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारावर प्रा.श्री. सुभाष जगताप यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन पवन काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन जगन वाबळे यांनी मानले. येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे आणि उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ए व्ही लोळेवार, एन टी सोळंके, एस जी जाधव, चव्हाण, हनवते, पी पी शिरसाट, एस पी गहेरवार, बी बी शिंदे, ए डी मस्के, अमोल कान्हेड, आर एस जांभळे, आर एन बांगर, एस पी पाठक, वडकुते, जे टी होडगीर, ए एस गिराम गुहाडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील लाभार्थ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील नागरिकांशी संवाद साधण्यासाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सुरू केलेल्या 'संवाद मराठवाड्याशी' या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या पहिल्याच संवाद कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित या उपक्रमात विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी बचत गटातील महिलांनी योजनांबाबतचे अनुभव सांगितले. तसेच आपल्या समस्या मांडल्या. या समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मराठवाड्यातील नागरिक विविध प्रशासकीय कामांसाठी, निवेदने सादर करण्यासाठी किंवा समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात येतात. मात्र, प्रशासकीय अधिकारी दौऱ्यावर किंवा अन्य कामांमुळे उपलब्ध नसल्यास नागरिकांना भेटीशिवाय परतावे लागते. ही बाब लक्षात घेऊन श्री. गावडे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी 'संवाद मराठवाड्याशी' हा नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ आज दुपारी ४ वाजता झाला. यावेळी मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या लाभार्थी महिला, स्वयंसहायता गट, ग्रामसंघ आणि स्थानिक नागरिकांशी श्री. गावडे यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. या कार्यक्रमाला विभागीय उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, उपायुक्त सुरेश बेदमुथा, सर्व निवासी उपजिल्हाधिकारी आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उपस्थित होते. लातूर येथून निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज जय भीम पदयात्रा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती १४ एप्रिल २०२५ रोजी साजरी होत आहे. या पार्श्वभूमीवर १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा प्रशासनाच्यावतीने जय भीम पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे.

दयानंद महाविद्यालय मैदान येथून लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या उपस्थितीत जय भीम पदयात्रा सुरू होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर पदयात्रेचा समारोप होईल. लेझीम पथक, झांज पथकासह भीम गीतांचा कार्यक्रम यावेळी आयोजित केला जाणार आहे. यासोबतच एनसीसी, एनएसएस, नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट अँड गाईडसह विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांचा या पदयात्रेत सहभागी होणार आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी दिली आहे.

### मारहाणीच्या घटनेतील आरोपीला अटक; पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** शहरातील अंबाजोगाई रोडवर दोन गटांत मारहाणीची गतमहिन्यात घडली होती. या घटनेतील फरार आरोपी प्रणव संधीकर याला पोलिसांनी मंगळवारी रात्री अटक केली. बुधवारी कोर्टात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.

आरोपी प्रणव संधीकर याच्याकडून अटपूर्व जामिनासाठी अर्ज करण्याच्या हालचाली सुरु असतानाच शिवाजी नगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी त्यास अटक केली. बुधवारी कोर्टात हजर केले असता ॲड. चव्हाण यांनी या गुन्ह्यातील इतर फरार आरोपी तसेच या आरोपीकडील रक्कम वसुलीसाठी पोलीस कोठडीची मागणी कोर्टाकडे केली तर सदरील गुन्ह्यांत आरोपीचा थेट संबंध नाही. शिवाय गुन्हा घडून २३ दिवस उलटले आहेत. तपासही अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे आरोपीला पोलीस कोठडी न देता न्यायालयीन कोठडीची मागणी आरोपीचे वकील ज्ञानोबा सूर्यवंशी यांनी केली होती. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकूण घेतल्यानंतर आरोपीला पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.

### जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, माजी मुख्याध्यापक, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रय गुंडेराव बनसोडे (वय ८०) यांचे शुक्रवारी सकाळच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले.

लातूरजवळील गंगापूर येथील त्यांच्या शेतात सायंकाळी पाच वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दत्तात्रय बनसोडे यांच्या पश्चात पत्नी विमलबाई, मुलगा जालना जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, ॲड, सुमेध बनसोडे, मुलगी मीरा, रोहिणी, डॉ. गौतमी, जावई प्रा. शिवशरण हावळे, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय बनसोडे यांनी २०१४ मध्ये कॉंग्रेस पक्षाकडून लोकसभेची निवडणूक लढविली होती. त्यापूर्वी ते लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांचे निकटवर्तीय म्हणून ते परिचित होते.

### 'क्रेडाई'च्या अध्यक्षपदी उदय पाटील, सचिवाची जबाबदारी मदने यांच्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** बिल्डर्स व डेव्हलपर्स यांची संघटना असलेल्या 'क्रेडाही लातूर'च्या अध्यक्षपदी उदय पाटील तर सचिवपदी विष्णू मदने यांची निवड करण्यात आली आहे. नूतन अध्यक्ष उदय पाटील यांच्यासह त्यांच्या टीमचे मावळते अध्यक्ष जगदीश कुलकर्णी व इतर मान्यवर सदस्यांनी स्वागत करून त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

क्रेडाईच्या नूतन कार्यकारिणीत उदय पाटील, विष्णू मदने, संतोष के. हत्ते, आशिष कामदार, किरण मंत्री आदिंचा समावेश आहे.

# मारहाण प्रकारणातील 'त्या' सात आरोपींना लावला मकोका

## लातूर पोलिसांची मोठी कारवाई : शहरातील औसा रोड परिसरात होती त्यांची दहशत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** शहरातील अंबाजोगाई रोड परिसरात काही दिवसांपूर्वी घडलेल्या भरदिवसाच्या मारहाणीप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई करत सात सराईत गुन्हेगाराविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही टोळी मागील अनेक वर्षांपासून औसा रोड परिसरात गुन्हेगारीचं जाळं विणत असल्याचे समोर आलं आहे.

शांतताप्रिय शहर म्हणून ओळख असणाऱ्या लातूर शहराला शैक्षणिक पंढरी म्हणून संबोधले जाते. शिक्षणाचा लातूर पॅटर्न देशभरात नावाजला असल्यामुळे या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून लातूरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गुन्हेगारी क्षेत्रात वेगवेगळे गुन्हे उघडकीस आणण्यास पोलिस प्रशासनास यश येत असले तरी गल्लोगल्ली असलेल्या दादा लोकांची दशहत कमी करण्यात मात्र पोलिसांना अपयश येत आहे. त्यामुळेच आता पोलिस प्रशासनाने संघटीत गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी मोक्का सारख्या कायद्याचा वापर करण्यास सुरुवात केली आहे.

या कायद्याअंतर्गत्त कारवाई करण्यात येत असल्यामुळे निश्चितच गुन्हेगारांवर जरब बसण्यास मोठी मदत होणार आहे. मात्र, या संघटीत गुन्हेगारीस खतपाणी घालणाऱ्या लातूरसह जिल्ह्यातील त्या आकांबाबत पोलिस कोणती भूमिका घेणार याची उत्सुकता आहे. या गुन्हेगारांच्या आकांवर कारवाई झाली तरच संघटीत गुन्हेगारीची पाळेमुळे संपूष्टात येतील, अशी भावना लातुरकरांतून व्यक्त होत आहे.

सदर घटनेत किरकोळ कारणावरून एका तरुणास भर रस्त्यात अमानुष मारहाण करण्यात आली होती. यानंतर संबंधित टोळीविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना अटक करण्यात आली. विशेष म्हणजे या टोळीतील बहुतांश आरोपी हे आधी हद्दपारी, झोपडपट्टी दादा कायदा, स्थानवद्धत्ता अशा विविध कायद्यांतर्गत अडकल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अजिंक्य निळकंठ मुळे (२८), लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, बालाजी राजेंद्र जगताप (२७), गायत्री नगर, अक्षय माधवराव कांबळे (२८), दत्तकृपा सोसायटी, एक विधीसंघर्षग्रस्त बालक, नितीन शिवदास भालके (२८), आदर्श कॉलनी, साहिल रशीद पठाण (२४), ड्रायव्हर कॉलनी, प्रणव प्रकाश संदीकर (२७), लक्ष्मी कॉलनी या सात जणांवर पोलिसांनी मोका अंतर्गत कारवाई केली आहे

या आरोपींनी मागील १० वर्षांपासून तलवार, कु-हाड, गावठी पिस्तूल यासारख्या घातक शस्त्रांचा वापर करत गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची माहिती आहे. त्यांच्याविरोधात लातूर शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १३ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक चांनी सादर केलेल्या प्रस्तावाला पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या शिफारशीनुसार पोलीस उपमहानिरीक्षक, नदिड परिक्षेत्र यांनी मोक्काची मंजूरी दिली. आता या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत यांच्याकडे देण्यात आला आहे.

# हज यात्रेकरूंसाठी चलन बदलासाठी लातुरात शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** हज कमिटी ऑफ इंडिया व राज्य हज कमिटीच्यावतीने २०२५ मध्ये हज यात्रेसाठी निवड झालेल्या भाविकांसाठी सुफा एज्युकेशन ॲण्ड सोशल वेल्फेअर सोसायटी आणि रहेनुमा-ए-हज कमिटीच्यावतीने १६ ते १७ एप्रिल दोन दिवस सऊदी चलन बदलासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ या वेळेत ६० फुट रोडवरील एम. के. फंक्शन हॉल येथे शिबिर होणार आहे.

हज कमिटी तसेच खासगी टूर कंपनीकडून जाणाऱ्या भाविकांसाठी सऊदी अरब येथील चलन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी रिझर्व्ह बॅंकेच्या मान्यतेनुसार दोन दिवस चलन बदल करून देण्यासाठी शिबिर आयोजित करण्यात आल्याचे मौलाना सय्यद शौकत अली, मोहम्मद कामील मणियार यांनी सांगितले.

अधिक माहितीसाठी लातूर येथे सलीम मणियार, असद सय्यद, डॉ. रईस खान, महेबूब शेख, इम्रान शेख, खलील शेख, इंजिनिअर मुख्तार शेख, रौफ खान, शरीफखाँ पठाण, मुजम्मील शेख, अली चौधरी, ॲड. रब्बानी, अहद तांबोळी, आमेर मणियार, सादीक अत्तार, लायक शेख, अहमदपूर येथे शन्नू खान, मजहर सय्यद, निलंगा येथे हमीद शेख, हाफिज महेबूब, उदगीरसाठी अर्शद देशमुख, चाकूर-नळेगावसाठी लायक सौदागर, औसा येथे मजहर सय्यद, बाशिद शेख यांच्याशी संपर्क साधवा.

हज यात्रेकरूंना चलन बदलून घेण्यासाठी पासपोर्ट, आधार कार्ड, पॅन कार्ड, हज कमिती ऑफ इंडियाचे ऑनलाइन स्टेटस् ही कागदपत्रे आवश्यक असल्याचे जिल्हा हज प्रशिक्षक अमिरपाशा मणियार यांनी सांगितले आहे.

शिबिरास वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन सुफा एज्युकेशन ॲन्ड सोशल वेल्फेअर सोसायटी, रहेनुमा ए हज कमिटीच्यावतीने करण्यात आले आहे.

# जयंती उत्सव समितीच्या महाआरोग्य शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी अनेकांनी अवयव दान नोंदणी करून महामानवाला अभिवादन केले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने ८ ते १४ एप्रिल दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे शुक्रवारी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांनी सहपत्नीक देहदान संकल्प करून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नोंदणी केली. यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष चिकटे, डॉ. सदानंद कांबळे, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. सचिन जाधव, डॉ. सुनील होळकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, ॲड. संभाजी पाटील, डॉ. विजय अजनीकर, नरसिंग घोडके, यू. डी. गायकवाड, भारतीय बौध्द महासभेच्या जिल्हाध्यक्ष आशा चिकटे, संगपाल शिंदे, ॲड. रमक जोगदंड, इंजिनियर सचिन गायकवाड, सुजाता अजनीकर, बौध्द महासभेचे विलास आल्टे, राजाराम साबळे, शोभा सोनकांबळे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मांजरेश्वर हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** सार्वजनिक जीवनात काम करीत कर्तव्य पार पाडत असताना लोकांचें सहकार्य व मांजरेश्वर हनुमान व लोकनेते विलासराव देशमुख यांचा आशीर्वाद त्यामुळें देशमुख परिवाराला मागच्या ५० वर्षापासून समाजकारण व राजकारण करण्याची संधी मिळाली त्यातून चांगल काम करता आले हणमंतानी दिलेली गदा यापुढेही आपल्या चांगल्या कामासाठी सदैव मी लातूरकरांच्या कायम सेवेत राहणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी शनिवारी मांजरेश्वर हनुमान मंदीरात भक्त संजय माने यांनी मांजरेश्वर हनुमान मंदिराला सव्वा किलो चांदीची



गदा अर्पण केली. त्यानंतर माने मित्र परिवाराच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते कार्यक्रमात बोलत होते तत्पूर्वी माजी मंत्री दिलीपराव देशमुख व सौ सुवर्णाताई देशमुख यांच्या हस्ते मांजरेश्वर हनुमानाची महापूजा करण्यात आली .

यावेळी पंडित आत्माराम शास्त्री आळंदीकर महाराज, माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे यशवंतराव पाटील, सर्जेराव मोरे, विजय देशमुख, ॲड. प्रमोद जाधव, रवींद्र काळे, शाम भोसले, बळवंत काळे, अनंतराव देशमुख, संतोष देशमुख, सचिन पाटील, गणपतराव बाजुळगे, विकास देशमुख, हरिराम कुलकर्णी, सचिन दाताळ, गुरुनाथ गवळी, बबन देशमुख यांच्यासह परिसरातील नागरिक व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# पोलीस प्रशासन अन् मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्याअनुषंगाने सार्वजनिक मंडळाची जय्यत तयारी सुरु असून हा जयंती उत्सव शांततेत पार पडावा यासाठीही पोलीस प्रशासनाकडून यंत्रणा उभारली जात आहे. मोटारसायकल रॅली, मिरवणुका शांततेत पार पाडाव्यात याकरिता पोलीस प्रशासनाने मंडळातील पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. नियम-अटींचे पालन करुन हा उत्सव साजरा करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले.

लातूर शहर उपविभागीय कार्यालय परिसरात गुरुवारी अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत तसेच सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी देखील काही मागण्या आणि सूचना पोलिसांकडे केल्या. वाहतूक कोंडी होणारे चौक तसेच वेळेत मिरवणूका मार्गस्थ व्हाव्यात याकरिता पोलिस प्रशासनाचे प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. तर मोटारसायकल रॅली, मिरवणुका या वेळेत मार्गस्थ करुन नियम-अटींचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# जयंतीनिमित्त क्रांतिसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल -** सत्यशोधक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी शहरासह जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये, संस्था आणि संघटनांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळा व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**'जी-२४' संघटना**

येथील 'जी-२४' या सामाजिक संघटनेच्यावतीने महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी त्यांच्या पुतळ्याला ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले-आंबेडकर-बसवण्णा सार्वजनिक जयंती समितीचे अध्यक्ष शिवाजीराव शिंदे, मकबूल वलांडीकर, प्रा. कल्याण कांबळे, हरिभाऊ गायकवाड, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, लक्ष्मण दावणकर, ॲड. वसंतराव उगीले, डॉ. गणेश गोमारे, गणेश रेकुळवाड, श्रीधर शेवाळे, डी. एन. सूर्यवंशी, डी. उमाकांत, शिरीष दिवेकर, महानंदा शेवाळे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरसिंग घोडके यांनी केले तर आभार भारत काळे यांनी मानले.

**महाविहार धम्मसेवक ग्रुप**

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविहार धम्मसेवक ग्रुपच्यावतीने महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा. यू. डी. गायकवाड, उदय सोनवणे, पांडुरंग अंबुलगेकर, अशोक कांबळे, ज्योतिराम लामतुरे, भरत कांबळे, उमाकांत धावारे, मिलिंद धावारे, आशा चिकटे, शोभा सोनकांबळे, पंचशीला बनसोडे, रेखा घोबाळे, अंजली सोनकांबळे, शकुंतला नेत्रगावकर, पृथ्वी सोनवणे आदी धम्मसेवक उपस्थित होते.

**दयानंद महाविद्यालय**

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात थोर समाजसुधारक महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, प्रा. अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, लिपिक बन्सी कांबळे, प्रा. शैलेश सूर्यवंशी, सतीश तांदळे, विष्णू नाईकवाडे, किशोर जाधव, मोहसीन शेख, सुदाम सातपुते, श्रावण माळी, अमोल क्षीरसागर, दीनदयाल पुरोहित, सागर इंदानी, पोपट बाजपाई, सुदर्शन काळे, अर्चना शर्मा आदी उपस्थित होते.

**कॉक्सिट महाविद्यालय**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्रा. संदिपान आण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कॉक्सिट महाविद्यालयात जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, सदस्य नागोराव पाटील, 'कॉक्सिट'चे प्राचार्य डॉ. व्ही. ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, डॉ. डी. आर. सोमवंशी, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, डॉ. सुमेध कांबळे, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा. कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे, जनसंपर्क अधिकारी प्रा. जितेंद्र बनसोडे व विद्यार्थी उपस्थित होते.

**संस्काररत्न इंग्लिश स्कूल**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा ज्योतिबा फुले आणि माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संस्काररत्न इंग्लिश स्कूल



येथे विद्यार्थ्यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी महात्मा फुले ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय चांभारगे, शिक्षक लवटे, राजकुमार बर्डे, संतोष बर्डे, श्लोक माळी, अलोक माळी, गिरी महाराज, दिगंबर माळी, ओम माळी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नायगाव तालुक्यात वाळू माफीया जोमात तर पोलीस, महसुल भुमिगत ?

**गोविंद नरसीकर**
**नरसी, दि.१२ एप्रिल-**

शासना मार्फत नायगाव तालुक्यात वाळूचा कुठलाच धक्का सुटला नसताना लोहा तालुक्यातील काही चोरटे वाळू माफिया नायगाव तालुक्यातून मात्र दररोज रात्री बोटीच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करत आहेत. आर्थिक लाभापोटी संबंधित महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने कुठलीही कारवाई होताना दिसून येत नाही.

नायगाव तालुक्यातील बरबडा,टाकळी अंतरगाव येथील गोदावरी नदी पात्रातून बोटीच्या सहाय्याने दररोज रात्री आठ ते नऊ सक्शन पंप, तराफा व बोटीच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू उपसा करून लोहा तालुक्यातील येळी येथे नेत आहेत्. व तेथून मोठमोठ्या हायवा टिप्परने ते येळी येथून मारतळा, नांदेड, कहाळा मार्ग गडगा, मुखेड, वजीरगाव पाटी ते कहाळा, नायगाव येथे भरदिवसा विक्री करून उच्छांद मांडला आहे. दरमहा ठरलेल्या प्रमाणे आर्थिक लाभापोटी नायगाव च्या तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड व कुंटूर पोलीस ठाण्याचे सपोनी रामकृष्ण पाटील तसेच बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी यांनी जानीव पुर्वक दुर्लक्ष करताना दिसून येत आहे. याबाबत अनेकांनी तोंडी व लेखी तक्रार देऊन ही कारवाई होताना दिसून येत नाही. उलट त्या वाळू माफियांच्या विरोधात कुणी तक्रार दिली तर महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने वाळू



माफियांना तुमच्या विरोधात तक्रार आली आहे. त्यांच काय ते बघून घ्या अशा सुचना वाळू माफियांना देत असल्याने ते माफिया तक्रारकर्त्यांना धमक्या देण्याचे प्रमाण वाढले आहे. तेव्हा जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी वेळीच लक्ष घालून या महसूल विभाव व पोलीस प्रशासनाची होणारी बदनामी व रात्री अवैध वाळू चोरी करणाऱ्या माफियांच्या विरोधात कारवाई करावी अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून जोर धरत आहे.

**विशेष पोलीस उप महानिरीक्षक यांची पथके भूमिगत ?**

नांदेड कार्यक्षेत्रातील अवैध धंद्यावर धडक कार्यवाही करण्यासाठी विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी खास पथके तयार केली.मागील काही महिन्यात या पथकांनी केलेल्या धाडसी कारवायांचे जनतेतून स्वागतही झाले.पण गेल्या काही दिवसात विशेष पोलीस पथकच भूमिगत झाल्याचे चित्र आहे.नायगाव तालुक्यात आजघडीला वाळूचे अवैध सिंडिकेट व बेफाम वाळू चोरी बिनधास्त सुरु आहे.शासनाला लाखोंचा चुना लागत असतानाही याकडे स्थानिक महसूल व पोलीस विभागाची अर्थपूर्ण डोळेझाक स्पष्टपने दिसून येत असताना किमान विशेष पोलीस उपमहानिरीक्षक नांदेड यांचे पथक तरी नायगाव तालुक्यातील गोदापट्यातील वाळू तस्करावर कारवाई करून वाळूच्या अवैध तस्करीवर लगाम लावेल काय ? असा प्रश्न या भागातील जनतेतून व्यक्त होत आहे.

# श्री. शिवमहापुराण कथा महासोहळा यशस्वीतेच सर्व श्रेय भक्तांचेच

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.१२ एप्रिल-**

मागील ६ ते १३ मार्च दरम्यान श्रीक्षेत्र पिंपळगाव येथील दत्त मंदिरात मोठ्या थाटात पार पडलेला श्री. शिवमहापुराण कथा व १०८ कुंडी विश्वशांती महायज्ञ अत्यंत शांततेत व अद्भुत, अद्वितीय आणि अप्रतिम, अलौकिक सोहळा पूर्णत्वास नेण्याचे संपूर्ण श्रेय भाविक भक्तांचेच आहे. असे गौरवोद्गार महंत श्री. गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांनी काढले. यावेळी ते श्रमपरिहार सोहळ्यात बोलत होते.

श्रीक्षेत्र पिंपळगाव येथील दत्त मंदिरात गुरुवारी महंत श्री. गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांनी श्रमपरिहार सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी महंत गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, ह. भ. प. माधव महाराज बोरगडीकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, तहसीलदार सुरेखा नांदे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना व्यंकटस्वामी महाराज म्हणाले, आपल्या संकल्पनेतून पार पडलेल्या श्री. शिवमहापुराण कथा व १०८ कुंडी विश्वशांती महायज्ञ सोहळ्यात देशभरातील विविध तीर्थस्थळ, संत आखाडे, नागा साधू, शंकराचार्य, संत, महंत अशा सुमारे साडेपाचशे महान योगी महात्म्यांनी उपस्थिती लावली होती. १७ लाख भाविकांनी शिवामहापुराण कथेचे श्रवण केले. सव्वा खंडी महापूजा, अन्नदानाचे महाकार्य, धार्मिक स्थळाची स्वच्छता सगळी कामे भाविकभक्तांनी स्वयंप्रेरणेने श्रमदानातून केली. किंबहुना श्री. दत्तप्रभूनी भक्तांच्या रुपाने ही सेवा करुन घेतली. या सोहळ्यासाठी प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी व्यवस्था ठेवण्यासाठी परिश्रम घेतले. वीज वितरण कंपनी,



राज्य परिवहन महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन, आजीमाजी खासदार, आमदार, राजकीय पुढारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार या सर्वांनी सनातन धर्माचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या कार्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली. आरोग्य विभागाने दहा हजार भाविकांना आरोग्य सेवा पुरवली. हजारो भाविकांनी श्रमदान करून शिवमहापुराण कथा व १०८ कुंडी विश्वशांती महायज्ञ सोहळा कुठलंही गालबोट न लागता यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जे सहकार्य केले. त्यांची सेवा वंदनीय होती, असे ते म्हणाले. सर्वांचे श्रीक्षेत्र पिंपळगाव दत्त मंदिर संस्थांच्या वतीने सर्वांचा सत्कार करून आभार व्यक्त केले. श्रमपरिहार सोहळ्याला हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती.

असा दैदीप्यमान व न भूतो न भविष्यती सोहळा याचि देही याचि डोळा पाहण्याचा योग गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांच्यामुळेच प्राप्त झाला. आंतरराष्ट्रीय दर्जाचे महान संत राजेंद्रदास महाराज यांच्या मुखअरविंदातून शिव महापुराण कथा श्रवणाने सर्वांचे कान तृप्त झाले. असे ह. भ. प. माधव महाराज बोरगडीकर यावेळी बोलताना म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त

### डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी खंदारे तर उपाध्यक्षपदी लांडगे

**उमरी** - येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक भीम जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी उपेंद्र गंगाधर खंदारे यांची तर उपाध्यक्षपदी गौतम लालबाग लांडगे यांची एकमताने निवड करण्यात आली कै . गिरीश भाऊ देशमुख गोरठेकर





मंगल कार्यालय उमरी येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नूतन जुनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य एस जाधव हे होते. या बैठकीचे प्रास्ताविक नगरसेवक ईश्वर विठ्ठलराव सवई यांनी केले व पुढील कार्य करण्याची अनुमती दिली आणि सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्ष उपेंद्र खंदारे, उपाध्यक्ष गौतम लांडगे, सचिव विठ्ठलराव सवई, सहसचिव अनिल सोनकांबळे, कोषाध्यक्ष सुरेश हाणवते, संघटक वसंत सवई, राजेश्वर सवई, कैलास सोनकांबळे, सल्लागार प्रशांत जोंधळे, ॲड. भीमराव सवई ,संदीप गोवंदे, डी.जी तूपसाखरे, सदस्य कपिल सवई, विशाल सवई, मिलिंद सवई, रवी सोनकांबळे, रविराज सवई, शुभम सोनकांबळे, सूर्यकांत सवई, अविनाश सवई, विकास खंदारे, विशाल सवई, चंद्रप्रकाश पवार, अजित सोनकांबळे, किरण कदम, गौतम सोनफळे, बाळू लांडगे, आकाश खंदारे, आकाश पवार, तरुण वाघमारे, सिद्धू वाघमारे, विजय गायकवाड, नागेश सोनकांबळे, अजय गायकवाड, निखिल सोनकांबळे आदी कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे उमरी तालुका अध्यक्ष मुख्याध्यापक जोंधळे माजी स्टेशन मास्तर पवार के एन, पत्रकार राहुल सोनकांबळे, पत्रकार प्रशांत जोंधळे, माहिती अधिकार तालुका अध्यक्ष संदीप गोवंदे, आदीसहित डॉक्टर आंबेडकर नगर, व्यंकटेश नगर, रापतवार नगर येथील सर्व तरुण कार्यकर्ते बुद्ध उपासक व शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती पत्रकार बांधव उपस्थित होते.

### प्रहारच्या वतीने आ. कोहळीकर यांच्या घरावर मशाल आंदोलन

**निवघा बाजार** -हदगाव तालुक्यातील मौजे कवळी येथील बाबुरावजी कदम यांच्या घरावर प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिनांक ११ एप्रिल रोजी मशाल आंदोलन करण्यात आले होते निवडणुकीपूर्वी सर्व पक्षी आमदार महोदयांनी त्याच्या पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्याद्वारे शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते आम्ही निवडून आल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करणार आहोत महाराष्ट्र शेतकऱ्यांचा विचार करता आसमानी संकट व वाढत्या मार्गाने शेतकरी कर्जाच्या खाईमध्ये बुडलेला आहे महाराष्ट्रात दिवसाला साथ शेतकरी आत्महत्या करत असल्याचा अहवाल सांगत आहे अशा परिस्थितीत मी शेतकऱ्यांचे पुत्र आहोत अशी जनतेला साथ घालून निवडून आलेली आमदार महोदय कर्जमाफीच्या संदर्भात चकार शब्द बोलत नाही. एप्रिल महिन्यामध्ये ११ एप्रिल शेतकऱ्याचा असून लिहिणारे शेतकऱ्याचा समस्याला वाचा फोडणारे महात्मा फुलेंची जयंती तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती या महापुरुषांच्या विचाराचे स्मरण करून देण्यासाठी गळ्यामध्ये निळा दुपट्टा व छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेत आलेले सरकार शेतकरी आत्महत्या करीत असताना त्यांच्या कर्जमाफीसाठी हातात भगवा दर्ज व प्रीती मशाल घेऊन आम्ही सर्व कार्यकर्ते बच्चुभाऊ कडू प्रहार जनशक्ती पक्ष संस्थापक अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनात वरील वरील आंदोलन करण्यात आले होते शेतकरी कर्जमाफी २ पेरणी ते कापणी पर्यंत खर्च चठएऋड मधून करणेबाबत दिव्यांग बांधव यांना ६ हजार रुपये मासिक मानधन वरील मशाल आंदोलनाचे नेतृत्व प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष अनिल दिगंबरराव कदम दीपकराव सूर्यवंशी तालुक्यातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते..

### राहुल जोंधळे यांचे निधन

**नांदेड**-येथील वैशालीनगर, तरोडा (बु.) नांदेड येथील रहिवासी व आदी महाराष्ट्र युट्युब चॅनेल संचालक व सुप्रसिद्ध छायाचित्रकार



राहुल सुदामराव जोंधळे (वय ५३ वर्षे) यांचे पुणे येथे् आज दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. उद्या दिनांक १३ एप्रिल २०२५ रोज रविवारी सकाळी ९ वाजता त्यांची अंत्ययात्रा वैशालीनगर येथील त्यांचे राहते घर येथून निघून शांतीधाम गोवर्धनघाट नांदेड येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई, वडील, तीन भाऊ, तीन बहिण, भाऊजी, मेहुणे, असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त आयकर अधिकारी सुदामराव जोंधळे यांचे ते मोठे सुपुत्र होत. माऊली होमिओपॅथिक महाविद्यालय उदगीर येथील प्रा.डॉ. मिलिंद जोंधळे यांचे ते मोठे बंधू होत. डॉ. प्राची व अदिती यांचे वडील होत.भावपूर्ण आदरांजली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानात सहभाग नोंदवावा : प्रविण गायकवाड

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१२ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राच्या वतीने दिनांक १३ एप्रिल ते २५ एप्रिल पर्यंत संपूर्ण राज्यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान प्रत्येक बुथवर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी प्रदेश स्तरावर एक समिती गठीत करण्यात आली असून या या समितीमार्फत संपूर्ण राज्यातील बुथ, मंडळ व जिल्हा निहाय्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानाचे संचलन केले जाणार आहे. अशाच प्रकारची त्रिस्तरीय समिती प्रत्येक जिल्ह्याला नेमन्यात आली आहे. भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान संचलन समितीचे प्रमुख संयोजक जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, अनुसूचित जाती मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष विलास साबळे, हदगाव विधानसभा संयोजक म्हणून व्यंकटेश लोणे, किनवट विधानसभा संयोजक म्हणून प्रदीप एडके यांच्या नेमणुका भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्याचे अध्यक्ष ऍड. किशोर देशमुख यांनी केल्या आहेत.

या समितीमार्फत जिल्ह्यातील मंडळ व बुथ निहाय कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे. दिनांक १५ ते २५ एप्रिल दरम्यान संघटनात्मक प्रत्येक जिल्ह्यात समाजातील प्रबुद्ध,प्रतिष्ठित प्रभावी व्यक्तींचे संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनासाठी भाजपच्या प्रदेश कार्यालयातून प्रत्येक जिल्ह्याला एक वक्ता कळविण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमात भाजपाच्या आमदार खासदार मंत्री बुथ मंडळ व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमात सहभाग नोंदवावा असे आवाहन भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानाचे संयोजक तथा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड यांनी केले आहे.

# २२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१२ एप्रिल-**

जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने शुक्रवार ११ एप्रिल रोजी बिलोली शहरात अचानक धाडी टाकून २२ तंबाखू विक्रेत्यांकडून १० हजार ७०० रुपये दंड आकारण्यात आला. ही कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बिलोली शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार ही कार्यवाही करण्यात आली आहे.

# एकाच रुग्णाची दोन लॅबमध्ये तपासणी; रिपोर्टमध्ये तफावत, रुग्णांमध्ये संभ्रम

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.१२ एप्रिल-**

हिमायतनगर तालुक्यातील खासगी रुग्णालयांसह लॅबोरेटरीच्या संख्येतही वाढ झाली आहे. दरम्यान शहरातील दोन वेगवेगळ्या लॅबोरेटरीमध्ये केवळ पाच मिनिटाच्या फरकाने तपासणी केल्यानंतरही दोन्ही लॅबोरेटरीच्या रिपोर्टमध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. त्यामुळे खरा अहवाल कोणत्या लॅबचा? असा प्रश्न उपस्थीत होत आहे.

हिमायतनगर शहरातील वेगवेगळ्या रिपोर्टमुळे रुग्णात संभ्रम होत आहे .पहिल्या लॅबोरेटरी आणि दुसर्या लॅबोरेटरीमध्ये बीपी आणि शुगरची तपासणी पाच ते दहा मिनिटाच्या अंतराने करण्यात आली, मात्र दोन्ही रिपोर्टमध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. तर ह्या दोन्ही पेक्षा तिसऱ्या लॅबोरेटरीचा रिपोर्ट वेगळाच असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आल्याने खरी लॅबोरेटरी कोणाची? असा प्रश्न उपस्थीत होत आहे.

सध्या ग्रामीण भागातही बीपी आणि शुगरच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. या रुग्णांची संख्या लक्षात घेऊन खाजगी लॅब वाल्यांचे चांगले जाळे शहरात पसरले असून रुग्णाकडून आवांच्या सवा पैसे घेऊन त्यांच्या माथी बोगस रिपोर्ट देऊन मोठ्या प्रमाणात रुग्णाची लूट करीत एकआहेत. या गंभीर बाबीकडे जिल्हा चिकित्सक निळकंठ भोसीकर यांनी तात्काळ लक्ष देऊन होणाऱ्या बोगस लॅबोरेटरी धारकांना चोप द्यावा अशी मागणी रुग्णांमधून होत आहे.

हिमायतनगर येथील त्या दोन लॅबोरेटरीच्या तपासणीत केवळ पाच, दहा मिनिटांच्या अंतरावर बदल दिसून येत आहे. तर तिसऱ्या लॅबोरेटरीचा अहवाल वेगळाच आहे. डॉक्टर सदर रिपोर्टपाहुनच औषधी देतात मात्र अहवालच चुकिचा असल्याने रुग्णांच्या जीवनाशी खेळ सुरू असल्याचे ७ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या अहवालावरून स्पष्ट होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन या लॅब तपासणी करणे गरजेचे बनले आहे. अशी मागणी रुग्णातून होत आहे.

# प्रोफेसर सिंकू कुमार यांची सल्लागारपदी नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१२ एप्रिल-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्राध्यापक सिंकू कुमार यांची भारत सरकारच्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या राष्ट्रीय मार्गदर्शन अभियानासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे्.



भारत सरकारच्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे राष्ट्रीय मार्गदर्शन अभियान हे राष्ट्रीय शिक्षण धोरण एनइपी २०२० च्या अनुषंगाने एक कार्यक्रम आहे जो मार्गदर्शकांना त्यांचे ज्ञान कौशल्य आणि अनुभव त्यांच्या शिष्यासोबत सामायिक करण्यासाठी व्यावसायिक विकासाच्या संधी प्रदान करतो जेणेकरून त्यांना प्रभावी शिक्षक बनवण्याच्या मार्गावर मदत करता येईल. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शन अभियानासाठी चौकट विकसित आणि डिझाईन करण्याचे काम राष्ट्रीय संस्थेला सोपवण्यात आले आहे राष्ट्रीय समुपदेश अभियानाचे उद्दिष्ट शिक्षकांना त्यांच्या भूमिका मध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आणि समकालीन शैक्षणिक आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यापक मार्गदर्शन आणि संसाधने प्रदान करणे आहे यामध्ये सल्लागाराची नियुक्ती उच्च शिक्षण संस्थेच्य११ प्राध्यापकाकडून केली जाते. ज्यांना सरकारकडून शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे आणि दर्जादाराला ऑनलाइन प्रश्न उत्तर प्रक्रियेतून जावे लागते सध्या प्रोफेसर सिंकु कुमार हे शैक्षणिक विज्ञान संकुलात प्राध्यापक आणि संचालक म्हणून काम करत आहेत. आणि उच्च शिक्षणातील त्यांच्या संशोधन आणि योगदानासाठी त्यांना सरकारी आणि गैर सरकारी संस्थांकडून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. उच्च शिक्षण क्षेत्रातील मान्यवर कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलगुरू अशोक महाजन, कुलगुरू जोगिंदर सिंग बिसेन ,सचिव फिजिकल एज्युकेशन फाउंडेशन ऑफ इंडिया, पियुष जैन दिल्ली, गुजरातचे माजी कुलगुरू अर्जुन सिंग राणा अहमदाबाद ,संदीप कुमार उत्तर प्रदेश, प्राध्यापक मनीयाझागु तामिळनाडू, राजकुमार माली पाटील कर्नाटक, मणिपूरचे प्रभाकर रेड्डी आणि काश्मीर केंद्रीय विद्यापीठाचे अजीम यांनी प्रोफेसर सिंकू कुमार यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# हिमायतनगरमध्ये गुटखाविक्री तेजीत; प्रशासनाची डोळेझाक

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.१२ एप्रिल-**

हिमायतनगर येथे शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्याची सर्रास विक्री केली जात आहे. परंतु अन्न व औषध प्रशासनाकडूनच याबाबत डोळेझाक केली जात आहे. त्यामुळे गुटखा विक्री करणाऱ्यांचे मनोबल उंचावत आहे. स्थानिक पोलीस प्रशासन ही गुटखाबंदी ची कारवाई अंमलात आणत नसल्याने गुटखा विक्रीचा अवैध धंदा शहरात राजरोसपणे चालु आहे.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरणारा गुटखा शासनाने कोट्यावधी रुपयांच्या महसूलाला अगदी लाथ मारुन महाराष्ट्र राज्यात गुटखाबंदी कायदा अंमलात आणला. राज्यात गुटखाबंदी आहे. परंतु हिमायतनगर शहरात शासनाच्या या कायद्याला हरताळ फासल्या जात आहे. हिमायतनगर शहरात तेलंगणा राज्यांतून गुटखा आयात केला जातो. येथे साठवणूक केली जाते. इथूनच चारचाकी वाहनाने गुटखा निर्यात केला जातो. ही बाब अनेक वेळा उघड़ झाली आहे. हिमायतनगर शहर हे गुटख्याचे माहेरघर बनले असून मोठ्याप्रमाणात गुटखा आयात व निर्यात केला जात आहे. या ठिकाणी गुटख्यांचे साठे मोठ्याप्रमाणात आहेत. आयात, निर्यात विक्री करणारे आता इतके निडर बनले आहेत की, पोलिसांसमोरुन गुटख्याच्या गाड्या जातात. परंतु 'माये'च्या लालसेपोटी पोलिस बघ्यांची भुमिका घेतात.

# श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि.१२ एप्रिल-**

कुंडलवाडी शहरात श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शहरात ठिक -ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जय विर हनुमान मंदीरात श्री हनुमानाला बावन तोळे चांदीचा मुखवटा श्री हनुमान भक्ता कडून मंदिराला दिलेल्या देणगीतून बसविण्यात आले . या प्रसंगी भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते शहरातील काळा मारोती, जय वीर हनुमान, जोड मारोती, खिडकी बेस हनुमान, साईबाबा मंदिर, व्यंकटेश मंदीर हनुमान, चूंगी नाका हनुमान, अशा विविध मंदिरात महाप्रसादाचे (भंडाऱ्याचें) आयोजन केले होते भक्तांनी याचा लाभ घेतला.

# रानडुकराच्या हल्ल्यात युवक गंभीर जखमी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१२ एप्रिल-**

शेतात कामासाठी गेलेल्या युवकावर रानडुकराने प्राणघातक हल्ला करुन गंभीर जखमी केले. ही घटना हदगाव तालुक्यातील उंचेगाव येथे १० एप्रिल रोजी घडली असून शासनाकडून मदत देण्याची मागणी होत आहे. अनिल मारोती शिंदे असे जखमीचे नाव आहे.

अनिल हा घरच्या शेत जमिनीमध्ये सकाळी ८ च्या सुमारास कामाला गेला होता शेतातील काम करत असताना १० एप्रिल रोजी अंदाजे सकाळी आठ वाजता अचानक पाठीमागून रानडुकरांचा कळप त्याच्या अंगावर आला व त्यामध्ये अनिल यास जबर धडक देऊन जखमी केली त्यामध्ये त्याच्या पायाला, मांडीला, हाताला, कमरेला, छातीला जबर मार लागला आहे. अनिल व मारुती शिंदे यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्याने व अनिल जखमी झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासकीय मदत तात्काळ द्यावी अशी मागणी मारोती शिंदे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय हदगाव येथे निवेदनाद्वारे केली आहे.

# गोदावरी अर्बनचा वाटसरूंची तहान भागविण्यासाठी पुढाकार ; 'सहकारसूर्या' समोर पाणपोईचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१२ एप्रिल-**

रणरणत्या उन्हात गरजवंत वाटसरुंची उन्हाळ्यात तहान भागविण्यासाठी गोदावरी अर्बनने 'सहकारसूर्य' मुख्यालया समोर पाणपोई सुरू केली आहे. या पाणपोईचे उदघाटन पाणी चित्रपट ज्यांच्या कर्तृत्वावर काढला गेला ते खरे नायक नागदरवाडीचे माजी सरपंच बाबुराव केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष राजश्री पाटील, उपाध्यक्ष हेमलता देसले, सचिव अँड रविंद्र रगटे, शासकीय अधिकारी अशोक देसले, व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, उपसर व्यवस्थापक विजय शिरमेवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

गोदावरी अर्बनचे संस्थापक मा.बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या नियोजनात संस्था आपल्या कार्यक्षेत्रातील पाचही राज्यात सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असते.

मागील काही दिवसांपासून नांदेडचे तापमान दिवसागणिक वाढत असून सध्याचा पारा ४१ अंशाच्या पुढे गेला आहे. गोदावरी अर्बनच्या मुख्यालयाच्या समोर पहाटे तीन पासून ग्रामीण भागातील शेकडो शेतकरी आपला भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येतात आणि आपला शेतमाल विक्री झाल्यावर ते गावी जातात. त्यासोबतच येथे पूर्णा, लिंबगाव, चुडावा, तळणी, मरळक, सायाळ, वाडी या गावांचा रिक्षाचा थांबा देखील आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाटसरूंची संख्या नियमित ये जा करीत असते. तसेच हा संपूर्ण परिसर तरोडा नाक्याच्या व्यापार ऊदीमांचे केंद्रस्थान असल्यामुळे नागरिकांची मोठी वर्दळ या भागात असते. या कडाक्याच्या उन्हात त्यांची तहान भागावी या उदात्त हेतूने संस्थेने येथे पाणपोई सुरू केली आहे.

यावेळी बाबूराव केंद्रे यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की सातत्याने चार वर्ष नागदरवाडी व परिसरातील पाण्याचे स्रोत वाढावे यासाठी तनमनधनाने आपण काम केले. जेव्हा आपण एखादा संकल्प हाती घेतो आणि त्यासाठी पूर्ण ताकदीने काम करतो त्यावेळी यश आपल्याला नक्की मिळते हीच माझ्या पाण्याची खरी कहाणी २आहे. संस्थेबद्दल गौरवोद्गार काढत नांदेड मध्येच नव्हे आर्थिक क्षेत्रातील सर्व राष्ट्रीय संस्थांना आदर्शवत असे काम गोदावरी अर्बनने केले आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी पाणी स्त्रोताचे प्रणेते बाबूराव केंद्रे आणि त्यांच्या सहचारिणी यांच्यामुळे वागदरवाडी पाणीदार झाले आहे असे कौतुक करीत पाण्याचे संस्कार रोजच्या आयुष्यात प्रत्येकाने अंगीकारणे गरजेचे आहे हे आवर्जून नमूद केले. अजूनही आपण पाण्याबाबत निष्काळजीपणा दाखवतो. जमिनीतील पाणी उपसा करण्यापेक्षा पाणी अडविणे व ते जमिनीत मुरवण्यावर काम करणे गरजेचे आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा हेमलता देसले यांनी आपल्या मातीतील माणूस आपल्या कामातून मोठी होतात आणि त्यांचावर सिनेमा येतो याचा अभिमान वाटतो. निस्वार्थ भावनेने केलेल काम आपल्याला आनंद देऊन जाते, या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी पाणी चित्रपटातील कलावंत रवी जाधव, दिनेश कवडे, मुख्य शाखा व्यवस्थापक अविनाश बोचरे, विपणन अधिकारी महेश केंद्रे, प्रशांत कदम, चंद्रशेखर शिंदे, सिडको शाखेचे गजानन पाटील यांच्यासह मुख्य शाखा व मुख्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com





बीड तालुक्यातील पेंडगाव येथे हनुमान जयंती निमित्त दर्शनासाठी लागलेली भाविकांची रांग तर दुसऱ्या छायाचित्रात गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील शिंदे वस्ती येथील हनुमान जयंती निमित्त दर्शन घेतांना नागरिक (कृष्णा शिंदे)

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दीक्षांत सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ एप्रिल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा महाविद्यालयीन स्तरावर संपन्न झाला. यावेळी मार्च / एप्रिल २०२४ व ऑक्टोबर २०२४ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात घेण्यात आलेल्या दीक्षांत सोहळ्यात प्रमाणपत्राचे वाटप प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.एन. के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, भाषा विषयाचे प्रमुख डॉ.के. बी. गंगणे, विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.प्रविण देशपांडे,सामाजिकशास्त्र प्रमुख डॉ. अरुण पेंटावार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सचिन रुद्रवार अधिक्षक सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सूचनेनुसार २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालय स्तरावर घेण्यात आला. यावेळी बी. ए. ,बी.एस्सी, बी. कॉम, बी.सी.ए., बी.सी.एस. व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# शहराच्या पाणी प्रश्नासाठी आ.संदीप क्षीरसागरांची भर उन्हात धावपळ

## म्हाळसजवळा येथे सुरू असलेल्या पाणीपुरवठा कामाची पाहणी करून जलदगतीने काम पूर्ण करण्याच्या दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ एप्रिल**

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने नागरिकांना पाण्यासाठी अडचण येऊ नये यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांची धावपळ सुरू आहे. शनिवार (दि.१२) रोजी भर उन्हात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे जाऊन सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना जलदगतीने काम पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत. काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि शहरातील नागरिकांना वेळेत पाणी मिळावे यासाठी आमदार क्षीरसागर यांचा प्रयत्न सुरू आहे.

सध्या उन्हाच्या झळा अधिक तीव्र होऊ लागल्या आहेत. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर देखील होऊ लागला आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचे काम म्हाळसजवळा परिसरात सुरू आहे. शनिवारी दुपारी भर उन्हात आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना केल्या आहेत तसेच काम अधिक गतीने पूर्ण करण्याचेही निर्देश दिले आहेत.



# महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा समाजासाठी उपयुक्त-सागर शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ एप्रिल**

स्वा सावरकर शैकणिक संकुल बीड येथील स्व .गोपीनाथ मुंडे सभाग्रहात डॉ.बाबासाहेब ओबेडकर जयंती निमित्त विवेक विचार मंच बीड व अखिल भारतीय अधिवक्ता परिषद बीड वतीने विशेष व्याख्यान शहरी माओवाद व महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा या विषयावर मा सागर शिंदे राज्य संयोजक विचार मंच महाराष्ट्र प्रांत यांचे आयोजित करणात आले.त्यांनी सांगितले की,

डॉ.बाबासाहेब आबेंडकर यांनी राज्यव्यवस्था ही समाज हितासाठी,मानवाच्या कल्याणासाठी आहे.

लोकशाही व्यवस्था व राज्य घटना समाजासाठी उपयुक्त आहे.समाजात चालणारी नक्षली चळवळ शहरी माओवाद कार्यरत हे विविध उदा देवून मांडलं समजातील या कृती याविरुद्ध महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा तयार होऊ घातला आहे कायदा हा उपयुक्त




आहे आलेत.चांगला कायदा आहे याचा समाजासाठी उपयोगी पडेल यात समाज हिताचा आहे . लोकशाही व संविधान रक्षणासाठी हा कायदा महत्वपूर्ण आहे अध्यक्षीय समारोप वाघमारे योनी करताना सांगितले की ता कायदा सुर्वासाठी आहे संविधानिक हक्क नागरिकोचे अबाधित आहेत.

विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.रणजीत वाघमारे, प्रमुख अतिथी मा. उमेश जगताप,भीमराव उजगरे विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे , मुख्याध्यापिका बालिका ताई देशमुख,विवेक विचार मंचचे देवगिरी प्रांत समन्वयक अरुणजी कराड सुद्धा उपस्थित होते.या कार्यक्रमास बीड शहरातील शिक्षक,प्राध्यापक, कर्मचारी,नागरिक उपस्थित होते.प्रास्ताविक विनायक कुलकर्णी सर व सुत्रसंचलन शंभूराजेजी महानोर (बीड शहर संयोजक) तसेच आभार प्रदर्शन प्रा. शशिकांत पसारकर यांनी केले.श्री.मुकुंद मिरगे सर यांनी पद्यगीत म्हटले. संयोजन समिती सदस्यानी कार्यक्रम यशस्वी होणे यासाठी विवेक विचार मंचचे बीड शहर सोशल मीडिया प्रमुख विनयजी कुलकर्णी व सदस्यांनी मेहनत घेतली. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगाता झाली.

# अंबाजोगाईकरांनी केला क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले जयंतीनिमित्त स्मारक निर्मितीचा संकल्प

**स्मारक ही तर प्रेरणा देणारी ऊर्जास्थाने - उद्घाटक डॉ.राजेश इंगोले यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ एप्रिल**

अंबाजोगाई शहरातील माळीनगर परिसरात शुक्रवारी महात्मा ज्योतीराव फुले यांची १९८ वी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.मधुकरराव इंगोले यांनी इथे सोसायटी स्थापन करीत असतानाच येथे महात्मा फुले यांच्या कार्याला उजाळा मिळावा म्हणून येथे स्मारक व्हावे याकरिता जागा राखून ठेवली होती. त्याबाबत रीतसर प्रक्रिया करून या जागेवर महात्मा फुले स्मारक बनवावे याकरिता त्यांनी प्रयत्न केला होता. महात्मा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त येथे जयंती साजरी करीत असताना या ठिकाणी महात्मा फुले स्मारक निर्मितीचा संकल्प परिसरातील सर्व नागरिकांनी व्यक्त केला. यावेळी या



विचारपीठावर कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बुद्धीष्ट इंटरनेशनल स्कुलचे रत्नदीप गोरे, अंबाजोगाईचे पीएसआय ज्ञानेश्वर कांबळे तर व्याख्याते म्हणून व्याख्याते म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे हेमंत धानोरकर, बाळासाहेब मसने, पत्रकार प्रा.गोविंद जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा फुले स्मारकाच्या नाम फलकाचे अनावरण उदघाटक डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहुजी महाराज, घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या उदघाटकीय भाषणात बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे हे मुलाचे आद्यकर्तव्य असते. माझ्या वडिलांनी ही सोसायटी करतांना इथे महात्मा फुले स्मारक असावे हे स्वप्न पाहिले होते आणि त्यासाठी येथे जागेची तजबीजही करून ठेवली होती. मध्यंतरात त्यांची प्रकृती स्थिर नसल्याने त्यांना या स्मारकाच्या निर्माणाबाबत काही कार्यवाही करता आली नाही याची खंतही त्यांनी मला बोलताना अनेकदा व्यक्त केली होती. परंतु, त्यांच्या या स्वप्नाला सत्यात उतरविण्यासाठी आता मी पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी येथे उपस्थितांना दिली. हे स्मारक भव्य दिव्य असेल आणि हे स्मारक महात्मा फुले यांच्या ऐतिहासिक कार्याला सतत उजाळा देत राहील आणि समाजाला प्रेरणा देत राहील याची काळजी ही स्मारक समिती घेणार असल्याचे सांगितले.

# होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत बीडच्या स्वरा उंडाळे हीस सूवर्णपदक



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ एप्रिल**

गेवराई तालुक्यातील गढी येथील जवाहर नवोदय विद्यालयात सहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या बीडच्या स्वरा श्रीकृष्ण उंडाळे या विद्यार्थीनीने होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.या बदद्ल तिचा बीड येथील चौंडेश्वरी देवी ट्रस्ट मंडळाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. तिच्या यशाबद्दल जवाहर नवोदय विद्यालयातील प्राचार्य, शिक्षकांसह वडील श्रीकृष्ण उंडाळे, आजोबा रमेश उंडाळे यांनी अभिनंदन केले आहे.

# क्रीडा भारती स्थापना दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ एप्रिल**

क्रीडा भारती अंबाजोगाई च्या वतीने श्री हनुमान जयंती तथा क्रीडा भारती स्थापना दिवस उत्साहात संपन्न झाला.श्रीराम नगर अंबाजोगाई येथील केशरीनंदन हनुमान मंदीरात आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा भारतीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने बलोपासनेची देवता श्री महाबली हनुमानाची जन्मदिनाच्या निमित्ताने पुजा व आरती करण्यात आली.



यावेळी क्रीडा भारती चे योग शिक्षक उत्रेश्वर पांचाळ गुरुजी यांनी व्हिएतनाम येथील हनोई येथे वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशन तर्फे नुकत्याच संपन्न झालेल्या वर्ल्ड आंतरराष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवून सिव्हर मेडल प्राप्त केल्याबद्दल क्रीडा भारती अंबाजोगाई च्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी अंबाजोगाई तालुका क्रीडा समन्वयक दत्ता देवकते, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक रमणजी सोनवळकर, ज्ञानेश मातेकर, सतिश बलुतकर,सह क्रीडा भारती चे. सदस्य तथा क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# काय करु आता धरुनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।। नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण । सार्थक लाजून नव्हे हित ।।

या अभंगात संत तुकाराम महाराजांनी जी चेतना मांडली , तीच चेतना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याच्या केंद्रस्थानी ठेवली . ' मूकनायक ' हे त्यांनी सुरु केलेलं पहिले नियतकालिक , या अभंगाचं प्रत्यक्ष उदाहरण होत - कारण त्यांनी गप्प राहणाऱ्यांना बोलायला शिकवल , आणि भीतीत जगणाऱ्यांना सन्मानानं जगायला शिकवल . यामुळेच या ओळी बाबासाहेबांनी मूकनायकचं ब्रीदवाक्य म्हणून निवडल्या .



बाबासाहेबांचं बालपण खूपच खडतर होत . जातीच्या विटंबनेने व्यापलेल , अभावांनी भरलेल . पण त्या सगळ्या अडचणींच्या पलीकडे एक तेजस्वी जिज्ञासू मन सतत ज्ञानाच्या दिशेनं झेपावत होत .

त्या वेळची गोष्ट - बाबासाहेब साताऱ्यात प्राथमिक शाळेत शिकत होते . वर्गात बसायला बाक नव्हते . शाळेतील सवर्ण मुले आणि शिक्षक त्यांच्याशी संपर्क टाळत . पाण्याच्या नळालाही बाबासाहेबांना हात लावता येत नसे . तहान लागली तरी शिपायाची वाट पहावी लागे - तो दया दाखवेल तरच तो त्यांना नळ सुरु करून देत असे . तो नसल्यावर अजून कोणते ही इतर विद्यार्थी त्यांना नळ सुरु करून देत नसत . या परिस्थितीचा सारांश त्यांने आपल्या एका लेखात पण नमूद केला आहे .


शिपाई नाही पाणी नाही ।

एक दिवस शिपाई गैरहजर होता . बाबासाहेब दिवसभर तहानलेलेच राहिले . हा अनुभव एका लहान मुलाला गारद करू शकतो , पण बाबासाहेबांनी मात्र तो अनुभव मनात कोरून ठेवला - म्हणूनच पुढे ते म्हणाले , शिक्षण हेच माझं शस्त्र आहे .

त्या वेळेस त्यांच्या वडिलांनी एकच गोष्ट मनात ठसवली होती - वाच , शिक, मोठं हो. आणि बाबासाहेबांनी ती शिकवण आयुष्यभर जपली . त्यांनी केवळ स्वतःसाठी शिकण्याचं स्वप्न पाहिलं नव्हत ; त्यांनी संपूर्ण वंचित समाजासाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा केला.त्यांच्या जयंतीदिनी , आपण केवळ पुष्पांजली वाहून थांबू नये. आपण विचार करायला हवा- बाबासाहेब असते तर आजच्या शिक्षणव्यवस्थेकडे कसं पाहिले असत ? त्यांनी दिलेलं ब्रीद आजही आपल्याला सांगत आहे -

भय झटक , नि:शंकपणे बोल, माणूस म्हणून उभा रहा .

बाबासाहेब आणि ग्रंथपाल :- डॉ.आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात खूप त्रास सहन केले , पण त्याचा परिणाम त्यांनी कधीही आपल्या शिक्षणावर होऊ दिला नाही . ते दररोज १४ ते १८ तास अभ्यास सहजच करत असे . बडोद्याचे शाहू महाराजांनी त्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले . बाबासाहेबांना पुस्तके वाचण्याची फार आवड होती . असे आख्यादित आहे की त्यांची वैयक्तिक लायब्ररी जगातील सर्वात मोठी लायब्ररी होती आणि त्यात पुस्तकांची संख्या ५० हजारांपेक्षा देखील अधिक होती . लंडन येथे वास्तव्याच्या वेळी ते दररोज एका लायब्ररीत जात असे आणि तासंतास अभ्यास करत असत . एकदा ते दुपारच्या जेवणाच्या वेळी लायब्ररीत बसून भाकरी खात होते तेव्हा ग्रंथपालाने त्यांना बघितले आणि त्यांना चिडवले आणि टोमणा दिला की कॅफेटेरिया जाण्याऐवजी ते येथे लपून-छपून भोजन करत आहे . ग्रंथपालाने त्यांना शिक्षा करण्याची व त्याचे सदस्यत्व संपविण्याची धमकी दिली . ते ऐकून बाबासाहेबांनी त्यांची माफी मागितली आणि स्वतःच्या आणि आपल्या समाजाच्या संघर्ष आणि इंग्लंडमध्ये येण्याचे कारण सांगितले . तसेच दुपारच्या जेवणासाठी कॅफेटेरिया जाण्यासाठी आपल्याकडे पुरेसे पैसे नसल्याची प्रामाणिक कबुलीही त्याने दिली . हे ऐकल्यावर ग्रंथपाल म्हणाला - आजपासून आपण दुपारच्या जेवण्याच्या वेळी येथे न बसता माझ्यासोबतच कॅफेटेरियात येणार आणि मी माझे भोजन तुमच्याबरोबर वाटून खाणार . ग्रंथपाल एक ज्यू ( यहुदी ) होता आणि त्याचा या वागणुकीमुळे बाबासाहेबांच्या मनात यहुदींसाठी एक विशेष आदराचे स्थान होते .



बाबासाहेबांचा आदर्श म्हणजे आत्मसन्मान , बुद्धिवाद , आणि सत्यासाठीचा निर्धार . ते सांगून गेले - जोपर्यंत समाजात विषमता आहे , तोपर्यंत स्वातंत्र्य अपूर्ण आहे . म्हणूनच , त्यांच्या विचारांना कृतीत उतरवणं हेच खरे अभिवादन ठरेल.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**